RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - २ रे | अंक -१६९ वा | अमरावती (महाराष्ट्र) | मंगळवार दि.३० जुलै २०२४ | संपादक - शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -६

## फडणवीसांच्या डोक्यावर भाजप अध्यक्षपदाचा ताज? मोदींच्या भेटीनंतर घडामोडींना वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नवी दिल्ली**

राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात आज एक महत्वाची घडामोड घडली. तसं पाहिलं तर ही घटना लहानच आहे. पण राजकारणात ज्या चर्चा आता सुरू आहेत त्या लक्षात घेतल्या तर मोठी आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीनंतर देवेंद्र फडणवीस भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांची जागी घेतील अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. या पदासाठी ज्या नेत्यांची नावं चर्चेत आहेत त्यात फडणवीस प्रबळ दावेदार मानले जात आहेत.



विद्यमान अध्यक्ष जेपी नड्डा यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ संपला आहे. मात्र त्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. नव्या अध्यक्षाच्या शोधासाठी भाजपने एक समिती स्थापन केली आहे. महाराष्ट्रातून भाजप महासचिव विनोद तावडे आणि देवेंद्र फडणवीस यांची नावं चर्चेत आहेत.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार देवेंद्र फडणवीस यांनी पत्नी आणि मुलीसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेली भेटीमुळे असे संकेत मिळत आहेत की पक्ष नेतृत्व फडणवीसांना पक्ष संघटनेत मोठ्या पदावर नियुक्त करण्याच्या विचारात आहे. याआधी भाजप आणि आरएसएस यांच्यात नावांबाबतीत काही मतभेद होते. यामुळे राष्ट्रीय भाजप प्रमुखांच्या नियुक्तीत उशीर झाला. पण आता फडणवीसांबाबत सहमती बनताना दिसत आहे. यामुळेच आताची ही भेट महत्वपूर्ण मानली जात आहे.

आणखी एका नेत्याने सांगितले की फडणवीस यांना एक तर पक्षाचं अध्यक्ष बनवण्यात यावं किंवा त्यांना केंद्रात मंत्रिपद देण्यात यावं असे दोन मतप्रवाह भाजपात आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ फडणवीसांना अध्यक्ष बनविण्याच्या बाजूने आहे. यामुळे फडणवीस केंद्रीय राजकारणात दीर्घ काळ भूमिका बजावत राहतील. फडणवीस नागपूरचे आहेत. संघाचं मुख्यालय सुद्धा नागपूर आहे. पीएम मोदींचे निकटवर्तीय म्हणूनही त्यांची ओळख आहे. यामुळे त्यांना अध्यक्ष होण्यात फारशा अडचणी नाहीत असे सांगितले जात आहे.

आरएसएसच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्यानेही या घडामोडींची खात्री केली. फडणवीसांना उपमुख्यमंत्री बनवलं गेलं. यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला मोठा धक्का बसला. कशाबशा नऊ जागा जिंकता आल्या. अशा परिस्थितीत आता फडणवीसांना महाराष्ट्रात ठेवण्यात काहीच अर्थ नाही. मराठा समाजात त्यांच्याबद्दल मोठा रोष आहे. दलित वर्गातही मोठी नाराजी दिसून येते. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी पक्षाच्या कामकाजात आघाडीवर ठेवणे हा निर्णय योग्य होणार नाही असे त्यांनी सांगितले.

## नवाब मलिक पुन्हा येणार ॲक्शनमध्ये! निवडणुकीच्या मैदानातही दिसणार; सुप्रीम कोर्टाचा मोठा दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**

राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक आता पुन्हा ॲक्शन मोडमध्ये दिसून येणार आहेत, एवढंच नाही तर विधानसभा निवडणुकीच्या मैदानातही दिसणार आहेत. कारण मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा जामीन वाढवला आहे. उच्च न्यायालयाचा निर्णय अद्याप आला नसल्याने सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा जामीन वाढवला आहे. त्यामुळे आता नवाब मलिक यांचा निवडणूक लढवण्याचाही मार्ग मोकळा झाला असल्याचं दिसून येत आहे.

मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांना जामीन मंजूर केलायं. आजारपणाचा आधार घेत न्यायालयाने त्यांचा जामीन मंजूर केला आहे. एऊने फेब्रुवारी २०२२ मध्ये मलिकला गँगस्टर दाऊद इब्राहिम आणि त्याच्या साथीदारांच्या कारवायांशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अटक केली होती. त्यांना किडनीच्या आजाराबरोबरच इतरही अनेक आजारांनी त्रस्त असल्याचे सांगत मलिक यांनी उच्च न्यायालयाकडे दिलासा मागितला होता.

## अजित पवार अमित शाहांना चोरून का भेटत होते? खासदार सुप्रिया सुळेंचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०पुणे**

महायुतीबरोबर जाण्याच्या अगोदर उपमुख्यमंत्री अजित पवार हे दिल्लीला गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीला जात असताना मास्क आणि टोपी घालून म्हणजे वेश बदलून दिल्लीला जात असायचे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. याबाबत त्यांनीच पत्रकारांबरोबरच्या अनौपचारिक गप्पामध्ये सांगितल्याचं बोललं जातं. यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सध्या आरोप प्रत्यारोप सुरु आहेत. आता यासंदर्भात बोलताना खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला. अजित पवार हे गृहमंत्री अमित शाह यांना चोरून का भेटत होते? त्यांच्यामध्ये एवढं काय शिजत होतं?, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला आहे.



अजित पवार यांच्या वेश बदलून दिल्लीला जात असल्याच्या चर्चांवर बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, अजित पवार हे नाव आणि वेश बदलून ते दिल्लीला जात असत असं त्यांनीच म्हटलं आहे. याबाबत मला तीन ते चार प्रश्न वाचारायचे आहेत. त्यावेळी तुम्ही विरोधी पक्षनेते होतात. मग विरोधी पक्षनेते असतानाही तुम्ही अमित शाह यांना का भेटत होतात? आता तुम्ही हे ही कबूल केलं आहे की तुम्ही अमित शाह यांना चोरून भेटत होतात. त्यावेळी तुम्ही महाराष्ट्रात भाजपाच्या विरोधात बोलत होतात आणि दुसरीकडे दिल्लीत त्यांच्याच नेत्यांना भेटत होतात. त्यामुळे तुम्ही महाराष्ट्राशी गद्दारी केली, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.खासदार सुळे पुढे म्हणाल्या, दुसरा मुद्दा असा आहे की, अजित पवार सातत्याने नाव बदलून दिल्लीला जात होते. पण हा देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे. आपल्या सारख्या सर्वसामान्य माणसांना विमानाने यायचं म्हटलं तर आधार कार्ड लागतं. आता अजित पवारांनी असं केलं तर उध्या एखादा दहशतवादी असं करेल. तोही नाव बदलून येईल. याची जबाबदारी कोण घेणार? यामध्ये मुंबई आणि दिल्ली विमानतळाची चौकशी झाली पाहिजे. तसंच एअरलाईन्सची देखील चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली.

## भारताच्या खात्यात दुसरं पदक, नेमबाजीत मनू भाकेर, सरबजोत सिंह जोडीची कमाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० पॅरीस**

मनू भाकेर व सरबजोत सिंह या नेमबाजांच्या जोडीने भारताला १० मीटर एअर पिस्तुलच्या मिश्र दुहेरी प्रकारात कांस्य पदक जिंकवून दिलं आहे. या जोडीने दक्षिण कोरियाच्या ली ओन्हो आणि ओह ए जिन यांचा १६-१० अशा मोठ्या फरकाने पराभव करत कांस्यपदक पटकावलं आहे. मनू भाकेरचं हे यंदाच्या ऑलिम्पिक स्पर्धेतल वैयक्तिक दुसरं पदक आहे. या ऐतिहासिक कामगिरीसह मनू ही स्वतंत्र भारताला एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदकं मिळवून देणारी पहिलीच खेळाडू ठरली आहे. दरम्यान, या सामन्यात भारतीय संघाने पहिला सेट गमावला होता. मात्र, दुसऱ्या सेटपासून या जोडीने सातत्याने आघाडी मिळवली. पाचवा सेट कोरियाने जिंकला. मात्र इतर सर्व सेट्सवर मनू व सरबजोतचं वर्चस्व राहीलं. सबरजोत तीन वेळा मागे पडला होता. मात्र त्यानतंर मनूने शानदार नेम साधून भारतीय संघाचं वर्चस्व कायम ठेवलं आणि अखेर कांस्य पदकाला गवसणी घातली.



दरम्यान, भारताने लंडन ऑलिम्पिक २०१२ नंतर पहिल्यांदाच नेमबाजीत दोन पदकं पटकावली होती. मनु व सरबजोत या जोडीने पात्रता फेरीत ५८० गुण मिळवत कांस्य पदकासाठीच्या सामन्यात स्थान निर्माण केलं होतं. या सामन्यात कोरियाने चांगली सुरुवात केली होती. तर सरबजोतने धिमी सुरुवात केली. पहिल्या फेरीत कोरियन संघाने २०.५ तर भारतीय संघाने १८.८ गुण मिळवले होते. मात्र त्यानंतर मनू व सरबजोतने संयमी खेळ सादर केला. दुसऱ्या फेरीत भारतीय जोडीने २१.२ तर कोरियाने १९.९ गुण मिळवले होते.तिसऱ्या फेरीत भारताने पुन्हा बाजी मारली. या फेरीत मनू-सरबजोत जोडीने २०.८ तर कोरियन संघाने १९.८ गुण मिळवले. पाचव्या फरीत भारतीय संघ मागे पडला होता. मात्र तोवर भारतीय संघ एकूण गुणांच्या बाबतीत पुढे निघून केला होता. सहाव्या फेरीआधी कोरियन संघाने टाईम आऊटची मागणी केली, मात्र त्याचा त्यांना फायदा झाला नाही. अखेरपर्यंत भारतीय जोडी कोरियन संघावर वरचढ ठरली आणि त्यांनी कांस्य पदकावर दावेदारी सिद्ध केली.

### मनूची ऐतिहासिक कामगिरी

मनू भाकेर ही ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली होती, तर आता तिने आणखी एक मोठा विक्रम केला आहे. एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदकं जिंकणारी स्वतंत्र भारताची ती पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

## आरक्षणाच्या मुद्द्यावर आगीत तेल ओतण्यासाठी शरद पवार मैदानात, प्रकाश आंबेडकरांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०लातूर**

प्रकाश आंबेडकर यांनी आता शरद पवारांना लक्ष केलं आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आता आगीत तेल ओतण्यासाठी शरद पवार उतरले आहेत अशी टीका प्रकाश आंबेडकरांनी केली आहे. दरम्यान, प्रकाश आंबेडकर यांनी नामांतराच्या मुद्द्यावरुन शरद पवारांवर टीका केली आहे. आरक्षण बचाव रॅली लातूरमध्ये होती. त्यावेळी उपस्थितांशी ते बोलत होते.

शरद पवार आरक्षणाच्या मुद्द्यावर आता तेल ओतण्यासाठी उतरले आहेत. शरद पवार आगीत तेल ओतत आहेत. नामांतराचा मुद्दा काढण्याचं कारण काय? नामांतर होऊन इतकी वर्षे झाली आहेत. फुले, शाहू, आंबेडकरवादी यांना उचकवण्यासाठी तो मुद्दा काढला आहे का? हा मुद्दा आत्ता उपस्थित करून शरद पवार यांना काय साध्य करायचं आहे? नामांतराचा मुद्दा बऱ्याच वर्षांपूर्वीचा होता. त्या मुद्द्याला शरद पवार ठरवून हवा देत आहेत. राज्यातील पुरोगामी विचारांच्या लोकांना उचकवण्याचं काम ते या माध्यमातून करत आहेत. असा गंभीर आरोप प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी केला.मनोज जरांगे यांनाही प्रकाश आंबेडकरांनी सल्ला दिला आहे. विधानसभा निवडणुकीत मनोज जरांगेंनी २८८ जागा लढवल्या पाहिजेत, त्यांची मागणी मान्य झाली नाही तर त्यांनी हा पर्याय स्वीकारला पाहिजे. सर्वसामान्य मराठ्यांना न्याय देण्यासाठी, त्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहचवण्यासाठी मनोज जरांगेंनी २८८ जागांवर निवडणूक लढवली पाहिजे. राज्यातील श्रीमंत मराठा समाज गरीब मराठ्यांचे प्रश्न दाबून टाकतो आहे. ही परिस्थिती बदलायची असेल तर मनोज जरांगेंनी निवडणुकीला सामोरं गेलं पाहिजे असा सल्ला प्रकाश आंबेडकर यांनी लातूरमधून त्यांना दिला आहे.



## काँग्रेसमध्ये नानाभाऊ-विजयभाऊ; एकमेकांना फाडून खाऊ अशी स्थिती, आशिष देशमुख यांची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**

काँग्रेसमध्ये विजय भाऊ व नानाभाऊ या दोघांना आता केवळ खुर्चीची स्वप्नं पडत आहेत. आपण दोघं भाऊ भाऊ आणि एकमेकांना फाडून खाऊ अशी या दोघांची स्थिती आहे. विदर्भाच्या राजकारणात या दोघांमधील संघर्षाची चर्चा चालू आहे, असं वक्तव्य भाजपा नेते आशिष देशमुख यांनी केलं आहे. देशमुख म्हणाले, विदर्भासह महाराष्ट्र काँग्रेसमध्ये केवळ नाना पटोले व विजय वडेट्टीवार या दोघांमधील वादांची चर्चा होत आहे. दोघांचं एकमेकांशी अजिबात पटत नाही. तिकीट वाटपावरूनही दोघांमध्ये संघर्ष झाला आहे. त्याउलट भाजपाप्रणित महायुतीने राज्यातील जनतेला उत्तम सरकार दिलं आहे. आशिष देशमुख हे पटोले आणि वडेट्टीवारांचे जुने सहकारी आहेत. पक्षविरोधी कारवायांचा ठपका ठेवून काँग्रेसने काही महिन्यांपूर्वी त्यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. त्यानंतर देशमुख भाजपात दाखल झाले. आता देशमुख यांनी त्यांच्या जुन्या सहकाऱ्यांवर टीका केली आहे.



आशिष देशमुख म्हणाले, विजय वडेट्टीवार व नाना पटोले या दोघांना केवळ खुर्चीची स्वप्नं पडत आहेत. आपण दोघे भाऊ भाऊ आणि एकमेकांना फाडून खाऊ, अशी या दोघांची स्थिती आहे. या दोघांमधील मतभेदांची चर्चा विदर्भाच्या राजकारणात रंगत आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार व काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले या दोघांमध्ये अजिबात पटत नाही. निवडणुकीच्या तिकिटांसाठी व वेगवेगळ्या जागांच्या वाटपावरून या दोघांनी एकमेकांना फाडून खाण्यापर्यंतची तयारी केली आहे. त्याउलट महायुती सरकार खऱ्या अर्थाने राज्यातील महिलांसाठी, शेतकऱ्यांसाठी काम करत आहे, त्यांना मदत करत आहे.दरम्यान, आशिष देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटातील आमदार अनिल देशमुखांवरही टीका केली होती. अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीसांवर गंभीर आरोप केले होते. तसेच त्यांच्याकडे पुरावे असलेला पेन ड्राईव्ह असल्याचा दावा केला होता. त्यावर आशिष देशमुख म्हणाले होते, अनिल देशमुख हे सुरुवातीपासूनच फॅशनेबल नेते असून उगाच काही तरी आरोप करायचा म्हणून, तसेच नवा ट्रेंड म्हणून पेन ड्राइव्ह दाखवत आहेत. परंतु, त्यात काहीच नाही. त्या पेन ड्राइव्हमध्ये काही असेल तर ते त्यांनी जनतेला दाखवावं अन्यथा त्यांची ओळख ही केवळ फॅशनेबल नेता म्हणून जनतेसमोर येईल.

## मराठा आरक्षण! सर्वच खासदारांनी मोदींना भेटून तोडगा काढावा - उद्धव ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

राज्यात मागील काही दिवसांपासून आरक्षणाच्या मुद्द्यावरुन ओबीसी आणि मराठा समाजात संघर्ष सुरु असल्याचं दिसून येत आहे. एकीकडे मराठा आरक्षणासाठी मराठा समाज आक्रमक झालायं तर दुसरीकडे ओबीसी नेतेही मागे राहिल्याचं दिसून आलं नाही. या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलकांनी थेट मातोश्रीवर जात उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर अनेक चर्चांना उधाण आलं. अखेर मराठा आरक्षणाबाबत उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केलीयं. आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा वाढवण्याचा अधिकार राज्याला नसून लोकसभेला आहे, त्यामुळे सर्वच खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटून मोदींनीच यावर तोडगा काढावा, अशी भूमिका ठाकरे यांनी मांडलीयं. ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते.



## संपादकीय ......

# राजकारणाचा 'अग्निपथ'

*भारतास बलशाली करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून, त्या दिशेने निर्धारपूर्वक पावले टाकण्याचे विद्यमान केंद्र सरकारचे गेल्या दहा वर्षांपासूनचे धोरण राहिले आहे. 'आम्हाला हलक्यात घेऊ नका, आज भारत हा जगातील पाचवी अर्थव्यवस्था आहे आणि तो आधुनिक शस्त्रास्त्रांनिशी सज्ज आहे,' असे स्पष्ट संकेत भारत सरकार देत आहे. पाकिस्तानी अतिरेक्यांनी पुलवामात जवानांना मारल्यानंतर, भारताने पाकिस्तानात घुसून हिसका दाखवला. गलवान खोऱ्यात चीनच्या घुसखोरीला चोख उत्तर दिले. डोकलाममध्ये 'अरे'ला 'का रे'ने उत्तर दिले. या पार्श्वभूमीवर संरक्षण क्षेत्रासाठी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात १ लाख ७२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. गतवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजांपेक्षा (बजेट एस्टिमेटस्) ही रक्कम पाच टक्क्यांनी जास्त आहे. या खर्चापैकी २७ टक्के खर्च भांडवली स्वरूपाचा असणार आहे, हे महत्त्वाचे. बॉर्डर रोड संघटनेसाठी ३० टक्के वाढीव तरतूद करण्यात आली, त्यामुळे सीमाभागातील रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात करणे शक्य होईल. लष्कराच्या गाड्या, रणगाडे वेळेत पोहोचू शकण्याच्या दृष्टीने हे खूप महत्त्वाचे. संरक्षण विभागासाठी इनोव्हिटव्ह तंत्रज्ञान राबवण्याकरिता ४०० कोटी रुपये बाजूला ठेवण्यात आले. त्यामुळे आधुनिकीकरणाला वेगळे परिमाणदेखील प्राप्त होण्याची आशा आहे.*

*एके काळी पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना, अटलबिहारी वाजपेयी यांनी चीनबाबतच्या भारताच्या लेच्यापेच्या धोरणावर टीका केली होती; परंतु ती करतानाही त्यांनी कधी संयम सोडला नाही. या तुलनेचा संदर्भ येथे राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या प्रस्तावावर बोलत असताना, रा. स्व. संघ आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी अग्निवीर योजना सैन्यावर थोपवली आहे, असा खळबळजनक आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत केला होता, त्याचा आहे. अग्निवीर योजनेत चारच वर्षांची सेवा देणे बंधनकारक आहे. त्यानंतर काढून टाकले जाईल. पेन्शनही मिळणार नाही. ही योजना लष्कराला कमकुवत करेल. हजारो लोकांना आपण शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण देऊन, त्यानंतर चार वर्षांनी समाजात सोडणार आहोत. त्यामुळे समाजात हिंसा वाढू शकते, अशी टीका राहुल यांनी केली होती. अग्निवीर योजनेतील शहिदांच्या कुटुंबीयांना सरकारकडून मदत मिळाली नसल्याचा दावा राहुल यांनी केला होता. तेव्हा संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी, शहिदांच्या कुटुंबीयांना एकेक कोटी रुपये मिळाले आहेत, असे स्पष्ट केले होते; परंतु त्यानंतरही संरक्षणमंत्र्यांनी खोटी माहिती दिल्याचा प्रत्यारोप राहुल यांनी केला. गेल्या शुक्रवारी कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने द्रास येथे केलेल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, अग्निपथ योजना ही लष्कराने हाती घेतलेल्या सुधारणांचे एक उत्तम उदाहरण आहे. सैन्यदले तरुण राखणे, सैन्याला युद्धासाठी नेहमी सज्ज ठेवणे हा या योजनेमागील हेतू आहे; परंतु काहीजणांनी हा राजकारणाचा मुद्दा केला. दुसरीकडे, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मात्र मोदी हे कारगिल विजयदिवशी शहिदांना आदरांजली वाहण्याच्या प्रसंगीही राजकारण करत असल्याचा प्रत्यारोप केला आहे. माजी लष्करप्रमुख जनरल (निवृत्त) मनोज नरवणे यांच्या पुस्तकातील माहितीचाही संदर्भ दिला जात आहे. लष्कराने ७५ टक्के सैनिकांना सामावून घेण्याचा आणि २५ टक्के सैनिकांना चार वर्षांनंतर निवृत्त करण्याचा प्रस्ताव मांडला होता. प्रत्यक्षात मोदी सरकारने याच्या उलट केले, असा खरगे यांचा आरोप आहे. केवळ काँग्रेस नव्हे, तर तृणमूल काँग्रेस व समाजवादी पक्षांनीही या मुद्द्यावरून टीका केली आहे.*

*हरियाणात नजीकच्या काळात विधानसभा निवडणुका होणार असून, तेथे अग्निवीरचा विषय महत्त्वाचा ठरणार आहे. हरियाणातून लष्करात मोठ्या प्रमाणावर भरती होते. तसेच अग्निवीर योजनेविरोधात तेथे लोकसभा निवडणुकीच्या वेळीच असंतोष प्रकट झाला होता. लोकसभा निवडणुकीत तेथे काँग्रेसला चांगले यश मिळाले आणि विधानसभा निवडणुकीतही या यशाची पुनरावृत्ती होईल, असे काँग्रेसला वाटते. बदलती हवा लक्षात घेऊन, हरियाणातील भाजपचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांनी राज्यातील अग्निवीरांना पोलिस, वन तसेच खनिकर्म खात्यांत दहा टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली आहे. ज्या अग्निवीरांना चार वर्षांनंतर सैन्यात सामावून घेतले जात नाही, त्यांना 'सेवानिधी' म्हणून पाच लाख रुपये दिले जातात. त्याखेरीज, सक्तीची मासिक बचत आणि काही प्रमाणात पर्यायी नोकर्यांची संधी दिली जाणार आहे. अग्निवीरांना सेंट्रल आर्म्ड पोलिस फोर्सेस व आसाम रायफल्समध्ये दहा टक्के नोकरीचे आरक्षण ठेवण्यात आले. तेथील नोकरीसाठी शारीरिक चाचणी देण्याची गरज नसेल, तसेच कॉन्स्टेबलची रँक मिळेल; परंतु चार वर्षांच्या सेवेनंतर अग्निवीरांना काढून टाकले जाणार असून, त्यांना कामस्वरूपी पेन्शन नाही, हा टीकेचा प्रमुख मुद्दा आहे.*

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची कार्यशाळा संपन्न

## विधवांचे सक्षमीकरण, शेतकरी कुटुंबांचे हक्क यावर मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती,** महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे एकदिवसीय जनजागृती कार्यशाळेचे आयोजन शनिवार दि. २७ जुलै रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे करण्यात आले होते. यावेळी विधवा महिलांचे सक्षमीकरण, शेतकऱ्यांच्या कुटुंबांचे हक्क, योजनेचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी अशा विविध विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.जिल्हाधिकारी सौरभ कटियार मार्गदर्शन करताना म्हणाले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्येला आळा घालणे आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबाकरिता करावयाचे उपायोजना अशा दोन विषयावर काम करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे प्रशासनाचे प्राधान्यक्रम असून त्यांची अंमलबजावणी करणे महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायमूर्ती के.के. टाटेड यांनी संघर्ष करणाऱ्या वर्गाला सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी भाषा हा कसा अडथळा आहे यावर मार्गदर्शन केले. स्वयंसेवी संस्थांना या योजनांबद्दल जागरुक करणे आवश्यक असल्याने त्यांनी सांगितले. आयोगामध्ये तक्रार कशी करावी, शेतकऱ्यांच्या समस्यांवरही त्यानी माहिती दिली. सदस्य एम.ए. सईद यांनी स्वयंसेवी संस्थांना विधवांचा संघटनात्मक कामकाजाच्या मुळाशी समावेश करण्याचा सल्ला दिला. अधिकारांसोबत कर्तव्य येतात कसेही ते म्हणाले . त्यांनी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची भूमिका स्पष्ट केली . जेव्हा ही कर्तव्ये लोकसेवक पार पाडत नाहीत, तेव्हा आयोग त्यांना त्यासाठी निर्देश देतो. चांगल्या परिणामांसाठी जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालयाने स्वयंसेवी संस्थांसोबत हातमिळवणी करून काम करावे, असे ही त्यांनी सांगितले. लोकांना आपल्याकडे न बोलवता आपण त्यांच्याकडे जाऊन त्याचे प्रश्न मार्गी लावावे असे त्यांनी सांगितले.




सचिव नितीन पाटील चडक्ठउ यांनी उत्पन्नाचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, आधार कार्ड आणि इतर कागदपत्रे देताना अडचणी काय असतात हे सांगितले. अशा अडचणींना मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी काय केले पाहिजे याविषयी माहिती करून दिली. समाजाच्या भल्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्राच्या पलीकडे जाऊन काम केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्यातील एकल महिला आणि स्वयंसेवी संस्था कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन कार्यक्रमासाठी आपली नोंदणी केली. चडक्ठउ सदस्य, धठ-(युवा ग्रामीण असोसिएशन) सदस्य आणि भागधारक यांच्यात संवादात्मक सत्र झाले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे महाराज यांच्या गीताने व राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन सोहळा झाला. अनुभव शिक्षा केंद्राच्या विद्यार्थ्यांनी एका शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या संघर्षावर डोळे उघडणारे पथनाट्य सादर केले. शेतकऱ्यांच्या विधवांना त्यांच्या पतीच्या मृत्यूसाठी कसे जबाबदार धरले जाते आणि समाजात महिलांना त्यांच्या हक्कांबद्दल कशी माहिती नसते याचे चित्रणही त्यांनी केले.

# हळद पिकासाठी खतांचे डोस कसे द्याल वाचा सविस्तर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती –**

हळद पिकांस सेंद्रिय खतांचा भरपूर पुरवठा केल्यास भरपूर उत्पादन मिळते. त्यासाठी हेक्टरी ३५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत लागवडीपूर्वी पूर्वमशागतीच्यावेळी जमिनीत टाकून चांगले मिसळावे. शेणखतामुळे गड्ड्यांची चांगली वाढ होते. रोग किडींचा प्रादुर्भाव कमी होतो.

पुरेसे शेणखत उपलब्ध नसल्यास इतर सेंद्रिय निविष्ठांचा अवलंब करावा. घनजीवामृत (९० टक्के शेण १० टक्के मूत्र) दोन दिवस सावलीत व उन्हात वाळवावे. हेक्टरी १५ टन वापरावे.

रासायनिक खतांमध्ये हळद पिकांस १.०० हेक्टर क्षेत्रासाठी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश द्यावे. संपूर्ण स्फुरद आणि पालाश लागवडीच्यावेळी द्यावे. नत्र मात्र २ हप्त्यात विभागून द्यावे.

नत्राचा पहिला हप्ता (१००.०० किलो नत्र) लागवडीनंतर ४५ दिवसांनी द्यावे त्यासोबत फेरस सल्फेट आणि झिंक सल्फेट प्रत्येकी १२ किलो द्यावे, तर राहिलेला दुसरा हप्ता (१००.०० किलो नत्र) भरणीच्यावेळी (लागवडीनंतर २.५ ते ३ महिन्यांनी) द्यावा.

तसेच भरणीच्यावेळी हेक्टरी २.० टन निंबोळी किंवा करंजी पेंडीचा वापर करावा आणि त्यासोबत पुन्हा फेरस सल्फेट आणि झिंक सल्फेट प्रत्येकी १२ किलो द्यावे.

थोडक्यात १.०० हेक्टर क्षेत्रासाठी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश उपलब्ध होण्यासाठी ८.०० ते ९.०० बॅग्स युरीया, १२.५० बॅग्स सिंगल सुपर फॉस्फेट आणि ३.५० बॅग्स म्यूरेट ऑफ पोटॅश देणे आवश्यक आहे.

**फर्टिगेशन**

सिंचन सुविधा उपलब्ध असल्यास केवळ रूंद वरंबा पध्दतीनेच हळद लागवड करावी. हळदीचे जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने ठिबक सिंचनाच्या माध्यमातून विद्राव्य खतांचा वापर केल्यास पिकाच्या गरजेनुसार खते देता येतात. त्यासाठी जमिनीचे माती परीक्षण करूनच विद्राव्य खतांचा वापर करावा.

एखादा अन्नघटक शिफारशीत प्रमाणापेक्षा अधिक अथवा कमी पडला तरी त्याचा परिणाम लगेचच पिकाच्या वाढीवर झालेला दिसून येतो. उदाहरणार्थ हळदीला नत्र घटक जास्त झाल्यास हळदीची शाकीय वाढ खूप जास्त होते आणि हळद काडावरती जाते.

हळद हे कंद वर्गीय पिक असल्याने हळदीला जेवढे अधिक फुटवे येतील तेवढे कंदाचे वजन वाढेल परिणामी कंद मोठा होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. फर्टिगेशन करताना प्रामुख्याने युरिया, फॉस्फरीक ॲसिड आणि पांढरा पोटॅशचा वापर करावा.


हळद पिकात फर्टिगेशनची सुरूवात हळद लागवडीनंतर १५ दिवसांनी करावी. जमिनीद्वारे द्यावयाची खतांची मात्रा आणि फर्टिगेशनद्वारे द्यावयाची खतांची मात्रा वेगवेगळी आहे.




# सतत गोड खाल्ल्यामुळे वाढतो ओबेसिटीचा धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती –** सतत गोड खाल्ल्यामुळे लठ्ठपणा म्हणजेच ओबेसिटीही वाढण्याचा धोका असतो. एकदा लठ्ठपणा शरीराला जडला, शरीर स्थूल बनले की मग त्याजोडीने मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार हे सोबतीला येतात.साखरेचे खाणार त्याला देव देणार अशी एक म्हण आहे. गोड पदार्थ खाण्याची आवड सर्वांनाच असते. त्यातून जेवल्यानंतर काहीतरी गोड खाण्याची भावना होत असते. काही लोक जेवणानंतर चमचाभर साखर किंवा गूळ खातात. त्याशिवाय गोड चहा, कॉफी आणि साखर घालून दूधही पितात. या सर्वांमुळे गोड खाण्याचे प्रमाण अधिक होते आणि शरीरात जास्त प्रमाणात साखरही जाते.गूळ किंवा साखर दोन्हीमध्ये कॅलरी सारख्याच प्रमाणात असतात. त्यामुळे शरीराचे नुकसानच होते. जास्त गोड खाल्ल्याने मधुमेह होण्याची शक्यता बळावते, हे आता सर्वश्रुत आहे. पण केवळ मधुमेहच नव्हे तर साखरेच्या किंवा गोड पदार्थांच्या अतिसेवनामुळे इतरही काही शारीरिक आजाराला आमंत्रण मिळते.



**सुरकुत्या :** अतिगोड खाल्ल्यास ती शरीरात रक्तात मिसळते आणि शरीरातील कोलेजेन आणि इलास्टिन दोन्हीत मिसळते. त्यामुळे त्वचा वयापेक्षा अधिक लवकर म्हातारी दिसू लागते. तसेच त्वचा कोरडी होते आणि तिला सुरकुत्याही पडतात.

**सांध्यामध्ये वेदना :** साखरेचे अतिसेवन केल्याने सांधेदुखीच्या आजाराने ग्रस्त होऊ शकतात. त्यामुळे सांधेदुखीचा त्रास होतो तसेच हाडे कमजोर होतात.

**हृदयविकार :** अतिगोड खाल्ल्यामुळे शरीरात चरबीचे किंवा मेदाचे प्रमाण वाढते. त्यामुळे कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते. कोलेस्ट्रॉल वाढल्याने हृदयाचे नुकसान होते आणि हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते.

**तणाव आणि घाबरणे:** शरीरात साखरेचे प्रमाण वाढल्याने नैराश्याची समस्या निर्माण होऊ शकते. त्याशिवाय मेंदूच्या पेशी आणि स्मरणशक्ती यांचे नुकसान होऊ शकते. बऱ्याचदा साखरेचे अतिसेवन केल्याने जीव घाबरा होणे आणि डोकेदुखी अशी लक्षणे दिसून येतात.जास्त साखर खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्तीच्या कार्यात अडथळा येतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. अशा परिस्थितीत सर्दी, फ्लू आणि इतर व्हायरल इन्फेक्शनचा धोका वाढतो. याशिवाय मिठाई सतत खाल्ल्याने हाडांवर दुष्परिणाम होतात. म्हणून तज्ज्ञ गोड कमी खाण्याचा सल्ला देतात. याखेरीज सतत गोड खाल्ल्यामुळे लठ्ठपणा म्हणजेच ओबेसिटीही वाढण्याचा धोका असतो.एकदा लठ्ठपणा शरीराला जडला, शरीर स्थूल बनले की, मग त्याजोडीने मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार हे सोबतीला येतात. दातांच्या आरोग्यासाठीही अतिगोड पदार्थांचे सेवन हानिकारक ठरते. कमी वयात दातांच्या समस्या जडू द्यायच्या नसतील तर गोड पदार्थांपासून चार हात लांब राहणेच योग्य !

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात ३० पदांकरिता प्रशिक्षणार्थ्यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती,** :कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्या संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे ३० प्रशिक्षण पदांसाठी निवड करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक पात्रताधारक युवक-युवतीनी दि. ३१ जुलै रोजी सकाळी १० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे. युवक, युवतींना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता वाढविण्यासाठी कार्यप्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक अहर्ताप्रमाणे बारावी पासकरिता ६ हजार रुपये, आयटीआय किंवा पदवीकाधारकासाठी ८ हजार व पदवीधर किंवा पदव्यूत्तर करिता १० हजार रुपये शासनाकडून विद्यावेतन दिले जाणार आहे. या कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने आहे.

**पात्रता :** उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा, उमेदवारांचे किमान वय १८ ते ३५ वर्ष असावे, शैक्षणिक पात्रता किमान बारावी पास, आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर असावी. शिक्षण चालू असलेले उमेदवार पात्र असणार नाही, उमेदवारांची आधार नोंदणी असावी. उमेदवारांचे बँक खाते आधार संलग्न असावे. उमेदवारांने विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी. अधिक माहीतीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्र, शासकिय तांत्रिक विद्यालय परिसर, उस्मानिया मस्जिद जवळ, बस स्टँण्ड रोड, अमरावती येथे प्रत्यक्ष संपर्क साधवा किंवा मो. क्र. ८६०५६५४०२५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. प्रशिक्षण उमेदवारांची ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणी नि:शुल्क व्यवस्था मुलाखतीच्या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

# बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तु संचाचे वितरण २९ पासून बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती–** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबईमार्फत जिल्ह्यातील नोंदणीकृती सक्रिय(जिवीत) बांधकाम कामगारांना कंपनीमार्फत गृहपयोगी वस्तु संच वितरीत तालुकास्तराव करण्यात येते होते. परंतु मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांचा गृहउपयोगी संच वाटपाचा पुरवठा आदेश संपल्यामुळे पुढील आदेशापर्यंत जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील नगरपरिषद येथील गृहपयोगी वस्तू संच वाटप दि. २९ जुलै २०२४ पासून बंद करण्यात आला आहे. तसेच नवीन पुरवठा आदेश प्राप्त होताच पूर्वीप्रमाणे गृहपयोगी वस्तू संच वितरीत करण्यात येईल,यांची सर्व बांधकाम कामगारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कार्यकारी अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त कार्यालयाव्दारे करण्यात आले आहे.

# शासनाच्या विविध योजनाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

## लाभार्थ्यांपर्यंत योजनाचा लाभ प्राध्यान्याने पोहचवावा- सौरभ कटियार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती,–** शासनाव्दारे समाजातील सर्व घटकासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनाचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत प्राध्यान्याने पोहचविण्यासाठी संबंधित विभागाने शर्तीचे प्रयत्न करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज दिले.

जिलहाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे शासनाच्या विविध योजनेचा आढावा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. अपर जिल्हाधिकिारी सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त माया केदार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर आदी उपस्थित होते.

कटियार म्हणाले की, शासनाव्दारे विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहे. यापैकी मुख्यमंत्री माझी लाडली बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, तीर्थक्षेत्र दर्शन योजना, अन्नपुर्ण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना व मुख्यमंत्री वयोश्री योजना या शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा. यासाठी संबंधित विभागाने विशेष मोहिम राबवून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचावावा. कोणत्याही पात्र लाभार्थी योजनेपासून वंचित राहू नये, यांची दक्षता संबंधितानी घ्यावी, असे निर्देश यावेळी दिले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ३० जुलै २०२४

शहर/ग्रामिण


### आमदार ड. यशोमती ठाकूर यांच्या इशाऱ्यापुढे सरकार नमले

# तिवसा पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०तिवसा** – नगरोत्थान अभियानांतर्गत सादर करण्यात आलेल्या तिवसा नगरपंचायत पाणीपुरवठा प्रकल्पाला अखेर राज्य शासनाने निधी मंजूर केला आहे याबाबतचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध झाला आहे. तिवसा मतदारसंघाच्या आमदार ड.यशोमती ठाकूर यांनी सातत्याने हा प्रश्न लावून धरला होता. नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनातही या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले होते. त्यानंतरही सरकारकडून कारवाई होत नाही हे पाहून सरकारला दिलेल्या आंदोलनाच्या सज्जड इशाऱ्यानंतर अखेर सरकार नमले आहे. सरकारने या पाणीपुरवठा योजनेचा निधी मंजूर केला आहे. या संदर्भात आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी समाधान व्यक्त केले असून अखेरीस या सरकारला जाग आली आहे. अमरावती जिल्ह्यातील तिवसा नगरपंचायतीच्या नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. अनेक वेळा आंदोलने केली, अखेरीस रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर उशिरा का होईना मुर्दाड सरकारला जाग आली असून सरकारने निधी मंजूर केला आहे.



अमरावती जिल्ह्यातील तिवसा नगरपंचायतीमधील पाणीपुरवठा योजना ताबडतोब सुरू करा, गेल्या काही महिन्यांपासून मुख्यमंत्र्यांकडे याबाबतची फाईल मंजुरीसाठी पडून असल्याने ती ताबडतोब मंजूर करावी, अशी आग्रही मागणी आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात केली होती.

तिवसा नगरपंचायतीतील पाणीपुरवठा योजना गेल्या अनेक महिन्यांपासून मंजुरीच्या प्रतीक्षेत होती. तिवसा नगरपंचायतीमधील नागरिकांच्या पाण्याचे भीषण हाल सध्या सुरू आहेत. ही पाणीपुरवठा योजना कार्यान्वित न झाल्यामुळे नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात स्थानिक आमदार आणि माजी मंत्री ड. यशोमती ठाकूर यांनी सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. तसेच याबाबत सरकारला जाग येत नसल्याने विविध आंदोलने ही केली.शहराचा पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रु २८.९९ कोटी रुपयांचा प्रस्ताव तांत्रिक मंजुरी घेऊन पुढील कारवाई व प्रशासकीय मान्यता मिळावी याबाबत मुख्यमंत्री कार्यालयात प्रलंबित होता. तिवसा शहरांतील नागरिकांना दरवर्षी पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. नदीला व डोह जो स्त्रोत आहे त्यात योजनेसाठी कृषी पाणी मुबलक आहे पण एकच टाकी आहे त्यामुळे (स्टोरेज) नाही, वितरिका नाही, शहराचे विस्तारिकरन होत आहे. विहिर अधिग्रहण करून नागरिकांना अनेक वर्षांपासून पाणी पुरवठा केला जात आहे. या संदर्भातविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पुन्हा एकदा सभागृहांमध्ये हा प्रश्न ड. ठाकूर यांनी मांडला होता. त्यानंतर ही हालचाल होत नाही हे पाहिल्यानंतर दिलेल्या सज्जन इशाऱ्यानंतर अखेरीस सरकारने या योजनेसाठी २७ कोटी ९१ लाख मंजूर केले आहेत. याबाबतचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला असून याबाबतचा कार्यादेश १८ महिन्यांसाठी असणार आहे. १८ महिन्यात हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना आदेशाद्वारे देण्यात आले आहेत. राज्य शासनातर्फे प्रकल्पासाठी ९५% म्हणजे २६ कोटी ५१ लाख अनुदान देण्यात येणार असून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा म्हणजेच तिवसा नगरपंचायतीचा ५% म्हणजे एक कोटी ३९ लाख रुपये सहभाग असणार आहे, तिवसा पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाने निधी मंजूर केल्याबद्दल ड.ठाकूर यांनी आनंद व्यक्त केला असून आता तिवसा नगरपंचायतीतील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सुटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## दापोरी येथील जिल्हा परिषद शाळेत कीर्तनाने शिक्षण सप्ताहाचा समारोप !

### जिल्हा परिषद शाळेचा आगळा वेगळा उपक्रम !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० दापोरी–** मोर्शी पंचायत समितीमध्ये विशेष उल्लेखनीय उपक्रम राबवणारी आदर्श शाळा म्हणजे दापोरी जिल्हा परिषद शाळेचा उल्लेख केला जातो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या चौथ्या वर्धापन दिना निमित्त केंद्र सरकारच्या व महाराष्ट्र शासनाने दिलेल्या माहितीनुसार जी प शाळा दापोरी येथे शिक्षण सप्ताह विविध प्रकारच्या कार्यक्रम ने साजरा करण्यात आला. पहिल्या दिवसापासून तर सातव्या दिवसापर्यंत नेत्रदीपक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. पहिल्या दिवशी ढड्ब् अंतर्गत विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य मुलांनी तयार केले, त्याची प्रदर्शन मांडण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी पायाभूत साक्षरता आणि संख्या ज्ञान बाबत जाणीव जागृती करण्यात आली. शाळेत डिस्कशन हॉल मध्ये ह्या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली ह्या मध्ये त्या त्या वर्गाचे शिक्षक सहभागी झाले होते. तिसऱ्या दिवशी क्रीडा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतात आला. देशी




खेळ बाबत क्रीडा शिक्षक श्री नेताजी पाटील यांनी विशेष मार्गदर्शन केले. चौथा दिवशी सर्वात आवडता विषय सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वेशभूषा, नृत्य गायन, तबला वादन, कविता गायन घेण्यात आले. पाचव्या दिवशी कौशल्य विकास शिबीर शाळेत घेण्यात आले, बँक व्यवहार, शॉप व्यवहार, ग्राहक दुकानदार व्यवहार संवाद कौशल्य असे विकसित करन्यासाठी उपक्रम राबविण्यात आला. सहाव्या दिवशी क्षेत्र भेट, डिजिटल स्किल विकास, अनिमेशन, वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षण सप्ताहाचा शेवट ह भ प नैतिक महाराज ह्या मुलाने सादर केलेल्या किर्तनाने करण्यात आली. वर्ग सहा वा मध्ये शिकणाऱ्या नैतिक ने सात दिवसाचा आढावा कीर्तनातून घेतला. एक मूल एक झाड, अंधश्रद्धा, कौशल्य विकास, स्वच्छता संदेश, व्यक्तिमत्त्व विकासाकरिता हा शिक्षण सप्ताह उपयोगी पडणार आहे. हा शिक्षण सप्ताह यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक गजानन चौधरी, केंद्र प्रमुख सुरेंद्र वानखडे, शाळेतील सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, गावकरी मंडळी यांनी विशेष प्रयत्न केले. शाळेतील सर्व उपक्रम बघून मोर्शी प,स चे गट शिक्षणाधिकारी डॉ नितीन उंडे, शा पो आ अधीक्षक सौ भवरे मॅडम, गावाच्या सरपंच सौ संगीता ताई ठाकरे, उप सरपंच श्री तायवाडे, ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यासह सर्व सदस्य यांनी शाळेचे कौतुक केले.


# अमरावती महापालिकेत करोडोंचा कर घोटाळा

## शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांचा आरोप

## पोलीस आयुक्तांना निवेदन – चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती** – अमरावती मनपाने कर सर्वेक्षणासाठी दिलेल्या कंत्राटामध्ये तसेच विशिष्ट मालमत्तांना चुकीच्या पद्धतीने कर लावणे किंवा कर आकारणे असे प्रकार करीत मनपा अधिकाऱ्यांनी मनपा व शासनाच्या तिजोरीला चुना लावत करोडोंचा कर घोटाळा केल्याचा आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केला आहे. या गंभीर प्रकरणी चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावे अशी मागणी पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून केलेली आहेअमरावती महानगरपालिकेत कर सर्वेक्षण व इतर अनुषंगिक कामासाठी निविदा प्रसिद्धकरून विशिष्ट कंत्राटदाराला मदत करण्यासाठी त्याला पोषक अशा




अटी व शर्ती निविदेमध्येसमाविष्ट करून गुन्हेगारी स्वरूपाचे षड्यंत्र रचून मनपा व शासनाच्या पैशाची लूट करण्यातआली आहे. विशेष म्हणजे कर सर्वेक्षणाबाबत असलेल्या निविदा प्रसिद्ध होण्यापूर्वीच अटी वशर्तीचे कागदपत्रे कशा पद्धतीने तयार करावे हे स्थापत्य कंपनी व कर मूल्यांकन अधिकारीयांनी संगमत करून तयार केलेले आहे. त्यामुळे या निविदेच्या अटी व शर्ती स्थापत्य कंपनीलानिविदा मिळावी या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या आहे व इतर कोणी या निविदेमध्ये भागघेतल्यास त्यांना अपात्र करण्याचा व्यवस्था मनपाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून करण्यातआलेली होती, असा आरोप सुनील खराटे यांनी निवेदनातून केला आहे .अमरावती महानगरपालिकेने यापूर्वी सभागृह अस्तित्वात असताना सदर काम करण्यासाठी सात कोटी रुपये देण्याचे ठरविल्रे होते. परंतु आर्थिक लाभापोटी तत्काल्रीन आयुक्त, कर मूल्यांकन अधिकारी व इतर अधिकाऱ्यांनी संगनमत करून सदर कामात कंत्राटदाराला विशेष मदत करून जवळपास ३० कोटीरुपयांपर्यंत आर्थिक लाभ पोहोचवला , अमरावती महानगरपालिकेत सभागृह अस्तित्वात नसताना वकायद्यानुसार बिगर आयएएस असलेत्रे आयुक्त पात्र नसताना प्रशासक म्हणून ठराव घेऊनमनपाचे आर्थिक नुकसान करून आपल्या पदाचा गैरवापर करून स्थापत्य कंपनीला फायदापोहोचण्यासाठी सदर कर कंत्राट देण्यात आलेला आहे,असे सुनील खराटे यांनी म्हटले आहे .तसेच स्थापत्य कंपनीने केलेल्या करारनाम्यानुसार तांत्रिक पात्रता नसलेल्या बिगर तांत्रिक लोकांकडून मनपा क्षेत्रातील सर्व मात्रमत्तेची त्रुटी पूर्ण मोजणी करून त्या मोजणीच्या आधारावर संपूर्ण शहरातील मात्रमत्तेने चुकीचा व जास्तीचा कर त्रावलेला आहे आणि मात्रमत्तेची संख्या वाढवण्यासाठी एका मालमत्तेची अनेक मालमत्तेमध्ये विभागणी करून मनपाची कोटी रुपयाची आर्थिक लूट केल्रेली असूनयामध्ये मोठा भ्रष्टाचार व आर्थिक अपहार झालेला आहे. त्यामुळे सदर बाबीची सखोल चौकशीकरून आपल्या पदाचा दुरुपयोग करून आर्थिक लाभ मिळून देण्याच्या हेतूने कंत्राट देण्याच्याप्रक्रिये मध्ये सहभागी असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना विरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांच्याविरुद्धकडक कारवाई करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी पोलीस आयुक्तांना निवेदन देऊन केली आहे .

### बिल्डर लॉबीला लाभ देण्याचा प्रयत्न

अमरावती महानगरपालिकेमध्ये कार्यरत असणारे कर अधिकारी व इतर अधिकाऱ्यांनीगेल्या अनेक वर्षापासून अनेक मोठ्या व्यावसायिक इमारतींना व अनेक बिल्डरच्या नावानेअसलेल्या भूखंडांना आर्थिक लाभ देऊन अतिशय कमी कर ल्रावलेला आहे किंवा काहीमालमत्तांना तर करच लावलेला नाही. त्यामुळे अमरावती महानगरपालिकेचे गेल्या दहा वर्षातजवळपास २०० कोटीच्या वर आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर बाब अतिशय गंभीर असूनअशा स्वरूपाचा कर घोटाळा नवी मुंबई महानगरपालिकेत सुदधा घडलेला होता .त्यामध्येसंबंधित सर्व अधिकाऱ्यांविरुदध गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. त्याच धर्तीवर अमरावतीमहानगरपालिकेमध्ये झालेल्या तब्बल २०० कोटीचा कर घोटाळ्याची सखोल चौकशी करूनजबाबदार असणाऱ्या कर अधिकारी व इतर सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करूनत्यांची संपूर्ण मालमत्तेची चौकशी करावी अशी मागणी सुनील खराटे यांनी केली आहे .

### सॉफ्टवेअर खरेदीत भ्रष्टाचार

विशेष म्हणजे याच स्थापत्य कंपनीने कर सर्वेक्षण व अनुषंगिक बाबी या कामासाठीपनवेल महानगरपात्रिकेमध्ये प्रति घर ३८७ रु प्रमाणे काम केलेले आहे.अतिशय गंभीर बाबम्हणजे कर प्रणाली सॉफ्टवेअरसाठी याच कंपनीने पनवेल महानगरपालिकेला १ लाख ४५हजार मध्ये व काही ठिकाणी ५ ते १० लाख रुपयामध्ये सदर सॉफ्टवेअरचा पुरवठा केलेलाआहे .परंतु अमरावती महानगरपात्रिकेने यासारखेच असणारे शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे१ कोटी ३३ लाख रुपयांमध्ये घेऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे, असे सुनील खराटे यांनी निवेदनात नमूद केले आहे .

### मनपाला दरवर्षी २० कोटीचे आर्थिक नुकसान



मनपाचे कर अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी आर्थिक लाभ मिळवण्याच्या हेतूने संबंधित कंपनीला मदत करून अतिशय जास्त दरात सदर काम दिलेले आहे. वास्तविक शासनाने महानगरपालिका क्षेत्रात कर सर्वेक्षण व संबंधित कामासाठी विशिष्ट दिशा निर्देश दिलेले असून त्यानुसार महानगरपालिकेला सदर सर्वेक्षणासाठी व इतर अनुषंगिक कामासाठी प्रति घर किवा मात्रमत्ता जास्तीत जास्त २२३ रुपये पर्यंत मोबदला देण्याचे निर्देश असताना अमरावती महानगरपालिकेने स्थापत्य कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांच्या आर्थिक लाभापोटी प्रति घर किंवा मालमत्ता ७५० देण्याचे मान्य केले. ज्यामुळे मनपाला जवळपास २०कोटी रुपयांचा आर्थिक नुकसान होत आहे असा दावा शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केला आहे .

# विदेशी नोटांच्या नावे गंडविले; बॅगमध्ये निघाले रद्दी पेपर!

## दर्यापूर शहरातील घटना : कोलकत्याच्या तीन भामट्यांविरूध्द गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती :** विदेशी नोटा देण्याच्या नावावर एका व्यावसायिकाला बॅगमध्ये चक्क रद्दी पेपर देऊन ५० हजार रुपयांनी गंडविण्यात आले. ही घटना २८ जुलै रोजी दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी फसवणूक झालेल्या व्यावसायिकाच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. शिवकुमार (४०), राकेश (३५) व ५५ वर्षीय महिला (सर्व रा. कोलकता, पश्चिम बंगाल) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. एफआयआर नुसार, दर्यापुरातील पंजाबराव कॉलनी येथील रहिवासी उमेश सुरेश गावंडे (३८) यांचे तेथेच सेतू व मिनी बँक ऑनलाइन सेंटर आहे. उमेश गावंडे हे रविवारी सेंटरवर असताना शिवकुमार नामक तरूण हा त्यांच्याकडे गेला. माझ्याकडे विदेशी नोटा आहेत, त्या भारतीय चलनात बदलून देता का, अशी विचारणा त्याने उमेश यांच्याकडे केली. उमेश यांनी त्याला होकार दिला. त्यानंतर शिवकुमार याचे साथीदार राकेश व एक महिला हे दोघे उमेश यांना भेटले. विदेशी नोटा देण्यासाठी त्यांनी उमेश यांच्याकडून ५० हजार रुपये रोख दिले. त्याचवेळी त्या दोघांनी उमेश यांना एक कॉलेज बॅग दिली. त्या बॅगमध्ये विदेशी चलनाच्या नोटा असल्याचे सांगून ते दोघे तेथून निघून गेले.

### बॅग पाहताच झाली फसवणुकीची जाणिव

आरोपी काही अंतरावर गेल्यानंतर उमेश गावंडे यांनी बॅग उघडून पाहिली. त्यात विदेशी नोटांऐवजी रद्दी पेपर असल्याचे त्यांना दिसून आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी दर्यापूर ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# व्यापारी संकुलांतील दुकानदारांना थकबाकीसाठी नोटीस

### गैरप्रकार आढळल्यास सील लावण्याचा उपायुक्तांकडून इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती:** शहरातील महापालिकेच्या व्यापारी संकुलातील दुकानदारांकडील थकबाकी वसुली करण्यासाठी नोटीसेस बजावण्याचे आदेश उपायुक्त माधुरी मडावी यांनी सोमवारी बाजार व परवाना विभागाला दिले. तसेच काही दुकानदारांनी नियमबाह्य पद्धतीने दुकानांमध्ये भोगवटदार ठेवले असल्यास प्रसंगी सदर दुकानांना सील लावण्याचाही इशारा उपायुक्तांनी दिला आहे.

शहरात महापालिकेची जवळपास २७ व्यापारी संकुले आहेत. या दुकानादारांकडील थकबाकी व भाड्याच्या दराचा मुद्दा गत काही वर्षांपासून प्रलंबित आहे. काही संकुलांची लीजसुद्धा संपली आहे. आधीच महापालिकेची आर्थिक परिस्थिती बेताची असून, मालमत्ता करही अपेक्षित वसूल झाला नाही. वेळोवेळी आलेल्या शासनाच्या आदेशाअन्वये रेडीरेकनरनुसार दुकानांच्या भाड्याचे दर निश्चित करणे आवश्यक असून, अद्याप हे दर निश्चित झालेले नाही. यासाठी आधी शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत समिती गठीत करण्यात आली होती. गत काही महिन्यांपूर्वी महापालिका आयुक्तांच्याच अध्यक्षतेत समिती गठीत करण्यात आली असून, त्यामध्ये महापालिकेतील अन्य अधिकारी व जिल्हा उपनिबंधकांसह आठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या समितीकडून नवे दर निश्चित होणे अद्याप बाकी असल्याने दुकानदारांच्याथकबाकीचा मुद्दा रेंगाळला आहे.




# अकरावी प्रवेश : विशेष फेरीसात सर्वांना अर्ज करण्याची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती–** कॉलेज स्टुडंटअकरावी प्रवेशाची पहिली विशेष प्रवेश यादी सोमवार, ५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर होणार आहे. पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश घेणे टाळणाऱ्या विद्यार्थ्यांनाही विशेष फेरीत सहभागी होता येणार आहे. सुरुवातीच्या तिन्ही नियमित फेऱ्यांमध्ये प्रतिबंधित झालेले सर्वविद्यार्थी विशेष फेरीमध्ये सहभागी होऊ शकतात. तसेच, विशेष फेरीपासून पुढे कोणत्याही विद्यार्थ्यांस प्रतिबंधित केले जाणार नाही.विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशाच्या संकेतस्थळावर जाऊन संबंधित महाविद्यालयातील रिक्त जागांची स्थिती तपासून महाविद्यालय पसंतीक्रम असणारा अर्जाचा भाग २ भरावा, पहिल्या विशेष यादी अंतर्गत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना ५ ते ८ ऑगस्ट या कालावधीत आपला प्रवेश निश्चित करावा लागणार आहे. तसेच ३१ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत महाविद्यालय पसंतीक्रम असणारा अर्जाचा भाग २ भरता येणार आहे. विद्यार्थ्यांची प्रवेश यादी ५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर प्रसिद्ध केली जाईल. अकरावी प्रवेशासाठीच्या तिसऱ्या नियमित फेरीअखेर ६ हजार ५६६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. तर ९ हजार ५९४ जागा रिक्त आहेत. शहरातील अकरावी विद्यार्थी प्रवेश क्षमता ही १६ हजार १६० इतकी आहे.



# जुनी पेन्शन च्या मागणीसाठी आंदोलनास सक्रिय पाठिंबा

## शिक्षक समिती सक्रिय सहभागी होणार...राज्याध्यक्ष विजय कोंबे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती–** नोव्हेंबर २००५ पासून सेवेत आलेले सर्व शासकीय, निम-शासकीय, अनुदानित संस्थातील कर्मचारी, शिक्षकांना १९८२ ची जुनी पेन्शन आणि १९८४ ची भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणे हा आपला हक्क आहे. शासनाने कर्मचाऱ्यांच्या संघटितलढ्यापश्चात कुटुंब निवृत्ती वेतन लागू केलेआहे. मात्र ३१ ऑक्टोबर २००५ च्या शासन निर्णयाने बंद झालेली जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करण्याची मागणी अद्यापही पूर्ण झालेली नाही. त्यासाठी संघर्ष थांबविणे योग्य ठरणार नाही अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ची ठाम भूमिका आहे. त्यामुळेच जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठीच्या कोणत्याही आंदोलनापासून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती विन्मुख राहू शकत नाही. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जुनी पेन्शनसाठीचा आवाज बुलंद करणे निश्चितच प्रासंगिक आहे. त्यामुळेच दि. २३ जून २०२४ रोजी चांदवड (नाशिक) येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य



प्राथमिक शिक्षक समिती च्या राज्य कार्यकारिणी सभेत जुनी पेन्शनसाठीच्या कोणत्याही लढ्यात शिक्षक समिती चा सहभाग राहील हा निर्णय घेण्यातआला.अशी माहीती शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी दिल्याचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

राज्यात जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी पेन्शन छत्री मोर्चा काढण्यात येत आहे. तर काही ठिकाणी धरणे/निदर्शने आंदोलन करण्यात येत आहे. सध्या राज्यात सुरु असलेल्या जुनी पेन्शन साठीच्या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने पूर्वीच निश्चित केल्यानुसार सक्रिय पाठिंब्याची घोषणा पुनश्च करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या सर्व राज्य, विभाग, जिल्हा, शहर, तालुका कार्यकारिणी आणि विविध आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना आपापल्या जिल्ह्यात होणाऱ्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्यासह अधिकाधिक कर्मचारी-शिक्षक बांधव सहभागी होण्यासाठी सुद्धा व्यापक प्रचार-प्रसार करावा. तसेच शिक्षक कर्मचारी बांधवांना विनंतीवजा आवाहन करण्यात येते की- जुनी पेन्शन साठीच्या लढ्यात सर्वांनी सहभागी व्हावे.असे आवाहन राज्याध्यक्ष विजय कोंबे,यांनी केले आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे जागतिक 'ओआरएस' दिन साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती–** जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती हे रुग्णांना जागरूक करण्यासाठी विविध उपक्रम/कार्यक्रमांचे आयोजन करत असते. जागतिक ओआरएस दिनाच्या अनुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, अतिरिक्त जिल्हाशल्यचिकित्सक डॉ. प्रमोद निरवणे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. सोळंके व डॉ. हेडाऊ, श्रीमती ललिता अटाळकर (मॅट्रॉन जि सा रु), यांच्या मार्गदर्शनात जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील बालरोग विभाग (पेडियाट्रिक वॉर्ड) येथे ओआरएस जागरुकता कार्यक्रम घेण्यात आला. यामधे रुग्णालयातील प्रमुख बालरोगतज्ञ डॉ. सोनाली शिरभाते यांनी बालरुग्णांच्या पालकांना ओआरएस बद्दल माहिती दिली. यामध्ये ओआरएसचे महत्व, वापरण्याची योग्य पद्धत, अतिसार व त्याची लक्षणे याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी बालरोगतज्ञ डॉ नीलेश पवार, प्रभाग प्रभारी परिचारिका मीना भालेराव, प्र.बा.रु.प. तेजस्विनी मेहरे, अधिपरिचारिका सुजाता भगत, डायट प्रमुख, यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमादरम्यान जिल्हा स्त्री रुग्णालय परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय, अमरावती येथील आरती अडाने, रितू बाचले, कांचन भगत, अंकिता चव्हाण, शिवानी दहीकर, सलोनी दरसिंबे, आंचल धाकाडे, संस्कृती धोमणे, मयुरी गवळीकर, साक्षी गवळीकर आदी विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. या नाट्याद्वारे रुग्णांच्या पालकांना ओआरएसचे महत्व पटवून देत, बाळाच्या वयानुसार कसा वापर करावा याची माहिती दिली. या जनजागृतीसाठी कनिष्ठ वैद्यकीय रहिवासी डॉ. ततहीर, डॉ. राहील, डॉक्टर ऑफ फार्मसी (फार्म डी) इंटर्न, जिल्हा स्त्री रुग्णालय परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच बाल रुग्णांच्या पालकांची मोठ्या संख्येत उपस्थिती होती.

# जिल्ह्यात पीक विम्याला संमिश्र प्रतिसाद

# २,०७,७८६ शेतकऱ्यांनीच काढला पीकविमा

## सहभागासाठी दोन दिवस शिल्लक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती –** केंद्र सरकारच्या खरीप पीकविमा योजनेत अद्याप निम्म्या शेतकऱ्यांनी सहभाग घेतलेला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील निम्मेच क्षेत्र विमा संरक्षित झालेले आहे. विशेष म्हणजे, मुदतवाढीनंतर या योजनेत सहभागासाठी केवळ दोन दिवस शिल्लक आहेत.




पीकविमा योजनेतील शेतकऱ्यांचा घटता सहभाग चिंतेचा विषय बनत आहे. कृषी विभागासमोर या दोन दिवसांत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्याचे आव्हान उभे ठाकले आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ५२ टक्के शेतीक्षेत्र विमा संरक्षित होऊ शकले आहे. ३१ जुलै ही या योजनेतील सहभागाची अंतिमनाही.मुदत आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या भरपाईसाठी केंद्राची प्रधानमंत्री पीकविमा योजना आहे. गतवर्षीच्या हंगामात जिल्ह्यातील २ लाख ६४ हजार ७७ शेतकऱ्यांनी खरीप हंगामात पीकविमा काढला होता. अतिवृष्टी व पावसाचा खंड, अशा नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मात्र विमा परतावा अपेक्षेनुरूप मिळाला नाही. स्थानिक नैसर्गिक आपत्ती, मीड टर्म, पेरणी पश्चात नुकसान झाल्यास जोखीम स्तरावर आधारित विमा परतावा दिल्या जातो. सरकारने शेतकऱ्यांसाठी एक रुपयात विमा योजना लागू केली असतानाही शेतकऱ्यांकडून बंदा त्याला अद्यापही हवा तसा प्रतिसाद मिळालेला ७ हजार काढला क्षेत्राच्या संरक्षित निम्मे नाही. उभे खरीप हंगाम २०२४ मध्ये जिल्ह्यात सरासरी पेरणी क्षेत्र ६ लाख ८१ हजार ७७९ हेक्टर असून प्रत्यक्ष ६ लाख ५० हजार १७३ हेक्टरमध्ये पेरणी झाली आहे. पेरणीचे प्रमाण सरासरी ९५ टक्के आहे. या तुलनेत पीकविमा योजनेत सहभागी शेतकऱ्यांची संख्या व क्षेत्र रोडावले आहे. जिल्ह्यातील ४ लाख ७० हजार २०५ पैकी २ लाख ७८६ शेतकऱ्यांनी पीकविमा आहे. त्यामुळे एकूण पेरणी तुलनेत ५५ टक्के क्षेत्र विमा झाले आहे. याचा अर्थ अद्यापही क्षेत्र विमा संरक्षणात आलेले नसून शेतकऱ्यांचा त्यासाठी उत्साह दिसून येत येत्या दोन दिवसांत ही संख्या वाढविण्याचे आव्हान कृषी विभागासमोर ठाकले आहे.

# प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती येथे एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परीषद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती–** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती येथे संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष मा. ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष मा. प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव मा. श्री. युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य मा. श्री. नितीन हिवसे, मा. पूनम चौधरी मा. पंकज देशमुख, मा. विनय गोहाड , मा प्रा गजानन काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश हरकुट यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. याचाच भाग म्हणुन प्राध्यापकांच्या संशोधनकासाठी मल्टी डीसेप्लनरी रिसर्च इन प्युअर ॲन्ड अपलाइड सायन्स मॅनेजमेंट, लायब्ररी सायन्स एन्ड स्पोर्ट सायन्स या विषयावर एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परीषदेचे आयोजन महाविद्यालयाच्या




प्रथम वर्ष अभियांत्रीकी विभागातर्फे रवीवार दि. २८-०७-२०२४ घेण्यात आली होती.यावेळी कार्यक्रमाचे स्वागत भाषण डॉ. सुप्रीया बेजलवार यांनी केले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश हरकुट यांनी आपले मार्गदर्शन केले. यात अश्या प्रकारच्या परीषद प्राध्यापकांमधील संशोधनवृत्ती वाढवत असतात असे प्रतीपादन केले. तसेच कार्यक्रमाच्या वेस्ट लंडन विद्यापीठ येथील डॉ. जेनिस फर्नांडीस तसेच फुजीराह विद्यापीठ यु.ए.ई. चे डॉ. अभिजीत केळकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. राजेन्द्र कुभांर यांनी मार्गदर्शन केले. यात एकुण १५४ संशोधकांनी आपले संशोधन पेपर प्रकाशीत केले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. आशिष कडु यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. आशिष कडु, डॉ. सईद ईब्राहीम, डॉ. नविन विघे, डॉ. मिर्झा बेग,डॉ. सुप्रिया बेजलवार, प्रा. महेश जानोलकर, डॉ. शशिकांत थोरात, प्रा. अलिम खान, डॉ. सुजाता म्हस्के, प्रा. कौशीक जोशी, प्रा. सिराज खान, डॉ. लोभस घडेकर, प्रा. शुभम कदम, प्रा. अमोल नेरकर, प्रा. प्रविण बोलके, प्रा. हुमायु खान, प्रा. भक्ते यांनी परीश्रम केले.

# न्यू हायस्कूल मेन शाळेच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती–** संस्थेचे आद्य संस्थापक थोर देशभक्त कै. दादासाहेब खापर्डे यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेतून राष्ट्रभक्त विचारांची पिढी निर्माण व्हावी या हेतूने सन १९२४ साली न्यू हायस्कूल मेन शाळेची स्थापना केली. या शाळेला सन २०२४ मध्ये शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्याने शाळा हे वर्ष शताब्दी वर्ष म्हणून साजरी करीत आहेत. आदानं हि विसर्गाय या उक्तीप्रमाणे नूतन विदर्भ शिक्षण मंडळ आजही काम करीत आहे. २७ व २८ जानेवारी २०२४ रोजी शताब्दी समारोहाची सुरुवात थाटामाटात झाली. या सोहळ्याला माजी विद्यार्थी व माजी शिक्षक उपस्थित होते. देश विदेशातून अनेक माजी विद्यार्थी त्या समारोहाला उपस्थित होते. शाळेप्रति कृतज्ञता म्हणून अनेक माजी विद्यार्थ्यांनी तसेच माजी शिक्षकांनी तन, मन, धनाने भरीव योग दान दिले. ज्या शाळेनी आपल्याला घडविले त्या शाळेसाठी काहीतरी करण्याची ओढ, धडपड अनेकांच्या मनात होतीच पण विद्यमान कार्यकारिणीच्या सुयोग्य मार्गदर्शनाने तिला योग्य दिशा मिळाली.या प्रसंगी काही



विकासात्मक योजना शाळेत सुरु कराव्या असे शाळेनी सुचविल्या नंतर माजी विद्यार्थी तसेच माजी शिक्षकांनी त्यासाठी धनाच्या स्वरुपात सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. निर्धारित योजना व त्यासाठी लागणारी धनराशी यांचे आराखडे तयार झाले. व माजी शिक्षक, माजी विद्यार्थी व अनेक हितचिंतक, दानदाते यांच्या सढळ आर्थिक सहकार्याने नाव नवीन परियोजना आकारास आल्या. केवळ ६ महिन्याच्या काळात अनेक विकासात्मक कामे झाली, पारदर्शकता व चोख व्यवहार हा या संस्थेचा विद्यमान कार्यकारिणीचा पाया आहे. या विकासात्म्मक कार्याचा कृतज्ञता सोहळा रविवार दिनांक २८ जुलै २०२४ रोजी शाळेच्या प्रांगणात संपन्न झाला.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा.डॉ.श्री. सुभाषणी कसबेकर (ज्येष्ठ उपाध्यक्ष नृ.वि.लि.म) तमेच श्री. निनाद वा सोमण (सचिव नृ.वि.नि.मं), श्री.व्ही. डी. जोशी (उपाध्यक्ष), श्री. प्रदीप पात्रीकर सौ. ममता पांडे (सहसचिव), थी. उपेंद्र बापोरीकर, श्री. संदेश गिरी, सौ. मंजिरी बळसे, सौ. वल्लरी ठिपसे, थी. अनंत निबोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व माजी शिक्षक व माजी विद्यार्थी हे उद्घाटक म्हणून आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्थाविक मुख्याध्यापिका फु.व्ही.वी. जवबंसी यांनी केले. पाहुण्याचा परिचय श्री. उमेन पिंपळकर व श्री. गणेश वायभासे यांनी करून दिला. संचलन व आभार प्रदर्शन अनुक्रमे सौ.एस.ए. देशपांडे, सौ.एम.पी. राऊत यांनी केले.सन १९७५ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांच्या आर्थिक योग दानातून तयार झालेल्या डिजिटल क्लास रूम ज्यामध्ये बेन्क्यु कंपनीचे २ इंटरॲक्टीव बोर्ड, ए.सी., साउंड सिस्टीम इत्यादी सुविधा असलेल्या वर्ग खोलीचे उद्घाटन १९७५बंच च्या हस्ते करण्यात आले. माजी विद्यार्थी मा.प्रविणजी पोटे (पाटील) ( माजी पालकमंत्री, अमरावती) यांच्या आर्थिक योगदानातून तयार झालेल्या डिजिटल क्लास ज्यामध्ये बेन्क्यु कंपनीचे २ इंटरॲक्टीव बोर्ड, ए.सी इत्यादी सुविधा असलेल्या वर्गखोलीचे उद्घाटन प्राध्यापक प्रा. संजय तिरथकर, प्रा. दिनेश सूर्यवंशी व ॲड. अरुण ठाकरे व प्रा. किशोर फुले यांच्या हस्ते करण्यात आले. अद्ययावत व आधुनिकतेने तयार केलेल्या संगणक कक्षाचे उद्घघाटन उपस्थित सर्व सन्माननीय माजी शिक्षक व माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. शनिवार पासून सुरु असलेली संततधार वृष्टी कार्यक्रमाच्या आधी थांबली श्री. वरूण राजाने कृपा केली. कृतज्ञता व लोकार्पण सोहळा आनंदात पार पडला.

अत्यंत सामान्य कुटुंबातून आलेल्या तसेच हलाखीच्या जीवन जगत असलेल्या विद्यार्थ्यांना आज उचा तंत्र जानाद्वारे सर्व शैक्षणिक सोई सुविधांचा लाभ घेता येणार आहे, अशा सुविधा कि ज्या मिळण्यासाठी अनेक विद्यालये भरभक्कम धनराशी आकारात असतात. परंतू या सर्व आधुनिक सुविधा शाळेच्या विद्यार्थ्यांना निशुल्क प्राप्त होत आहे. आज खत्या अर्थाने शिक्षण आनंदायी व कौशल्यपूर्ण होण्यास मदत मिळाली आहे. विद्यार्थ्यांना हे अत्याधुनिक तंत्रज्ञान जवळून हाताळता येणार आहे याचे संपूर्ण धेय माजी शिक्षक, माजी विद्यार्थी व समाजातील अनेक हितचिंतक, दानदातेयांच्या सडळ आर्थिक सहकार्याला जाते. या मर्वाप्रति नूतन विदर्भ शिक्षण मंडळ व न्यू हायस्कूल मेन परिवार कृतज्ञ आहे.

या सोहळ्याला शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव श्री.वी.गो. ठाकरे, श्री. चंद्रशेखर वाचपेयी, श्री. शेखर भोंदू, श्री.दिलीप पाटील, श्री. श्रीरंगजी हिर्लेकर, श्री. शंकर वानखेडे, श्री. प्रदीपजी सिकची व न्यू हायस्कूल मेन शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच माजी शक्षक, माजी विद्यार्थी व समाजातील अनेक हितचिंतक उपस्थित होते.

# एस टी महामंडळाला विठुराया पावला...४० हजार भक्तांचा लालपरीने प्रवास

## मागील वर्षीच्या तुलनेत उत्पन्नात वाढ




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती** पंढरपूर यात्रा महोत्सवाकरिता पंढरपूर, पुणे, आळंदी आदी ठिकाणी अतिरिक्त – बसेस सोडण्यात आल्या होत्या. या यात्रा महोत्सवा दरम्यान महिला, ६५ ५ वर्षावरील ज्येष्ठ व ७५ वर्षावरील अमृत नागरिकांना तब्बल ६५ लाख ९६ हजार ७३७ रुपयांची सवलत ३ योजने अंतर्गत एसटी महामंडळाच्या वतीने देण्यात आली. या दरम्यान जिल्ह्यातून २१३ बसेसच्या माध्यमातून ४१७ फेऱ्या करण्यात आल्या. या दिवसांमध्ये जिल्ह्यातील ४० हजार ४७२ विठ्ठल भक्तांनी प्रवास केला. दरवर्षी प्रवाशांच्या सुविधेकरीता एसटी महामंडळाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त अतिरिक्त बस सोडल्या जातात. यंदा जिल्ह्यातील आठ आगारातून अमरावती ते पंढरपूरकरिता १६३ बसेस सोडण्यात आल्या. याशिवाय पंढरपूर ते पुणे, आळंदी करीता ३५ आणि रिंगण यात्रेकरिता १५ बसेस सोडण्यात आल्या होत्या. अशा एकूण यात्रा महोत्सवा करीता २१३ बसेसच्या ४१७ फेऱ्या करण्यात आल्या आहेत. यातून एसटी महामंडळाला प्रत्यक्षात ५० लाख २६ हजार २५ रूपयांचे उत्पन्न झाले आहे.याशिवाय बसमधून महिलांना व ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात आली. तसेच ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास योजनेचाही लाभ देण्यात आला आहे. अशी ६५ लाख ६९ हजार ७३७ रुपयांची सवलत या प्रवाशांना योजनेअंतर्गत देण्यात आली आहे. त्यामुळे एसटी महामंडळाला केवळ आषाढी यात्रा महोत्सवा पोटी १ कोटी १५ लाख ९५ हजार ७६२ रूपयांचे निव्वळ – उत्पन्न झाले आहे. जिल्ह्यातून सुमारे ४० हजार ४७२ विठ्ठल भक्तांनी – बसमधून प्रवास केला आहे. याबाबत विभागीय वाहतुक अधिकारी योगेश ठाकरे यांनी माहीती दिली.

### मागील वर्षीच्या तुलनेत ३७ लाखांचे उत्पन्न वाढले

मागील वर्षीही आषाढी एकादशी निमित्य पंढरपूर यात्रा महोत्सवाकरिता बसेस सोडण्यात आल्या होत्या. मागील वर्षी यात्रा महोत्सवात ७८ लाख ९२हजार ५११ रुपयांची कमाई एसटी महामंडळाने केली होती. यंदा १ कोटी १५लाखांच्या घरात उत्पन्न गेले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत ३७ लाखांचेउत्पन्न वाढले आहे. यंदा प्रवासी संख्येमध्येही कमालीची वाढ झाली आहे.मागील वर्षी केवळ २४ हजार ९१९ विठ्ठल भक्तांनी बस मधून प्रवास केला होता. यंदा प्रवासी संख्येत वाढ झाल्याने ही संख्या ४० हजारावर पोहचली असल्याची माहिती आहे.

# आ. राणा यांच्या पुढाकाराने खोलापुरी गेट पोलीस स्टेशन नविन ईमारत बांधकाम करण्याकरीता ३ कोटी ६० रुपये मंजुर

## पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी; खोलापुरी गेट कृती समिती व अधिकाऱ्यांसमवेत बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

अमरावती पोलीस आयुक्तालय अंतर्गत अत्यंत संवेदनाशील असलेले खोलापुरी गेट पोलीस स्टेशन सध्या भाजीबाजार या ठिकाणी कार्यरत आहे. परंतु सदर पोलीस स्टेशन हे जेव्हापासून स्थापन झाले तेव्हापासून खोलापुरी गेट च्या समोर कार्यरत होते. परंतु तत्कालीन पोलीस आयुक्त यांनी सदर पोलीस स्टेशन हे भाजीबाजार या अत्यंत कमी जागेच्या ठिकाणी स्थापन करून त्या ठिकाणी हलविले. यावेळी स्थानिक नागरीकांनी आ.रवि राणा यांच्या सोबत आंदोलन सुध्दा केले होते.मागील अमरावतीमध्ये झालेल्या जातीय दंगलीमध्ये त्या भागातील नागरिकांना अनेक समस्याना सामोरे जावे लागले. म्हणून सदर पोलीस स्टेशन त्याच ठिकाणी व्हावे याकरिता त्या भागातील पोलीस स्टेशन बजाव कृती समितीने आमदार रवी राणा यांना निवेदन दिले व स्थानांतरित झालेल्या पोलीस स्टेशनचा



विरोध केला व तेव्हापासूनच संपूर्ण परिसर वासी व आजूबाजूचे नागरिक यांनी बडनेरा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार श्री रवी राणा यांच्याकडे याबाबत सतत पाठपुरावा करून हटवण्यात आलेले पोलीस स्टेशन पुन्हा त्याच जागेवर व्हावे याकरिता आंदोलन करून निवेदन सुद्धा दिले. त्या निवेदनाची दखल घेऊन आमदार रवी राणा यांनी राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री त्यांच्याकडे नवीन पोलीस स्टेशन बांधण्याकरिता तातडीने निधी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली होती. आ.रवि राणा यांच्या मागणीची दखल घेवुन माननीय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी खोलापुरी गेट पोलीस स्टेशन करिता ३ कोटी ६० लक्ष रुपये तातडीने मंजूर करून दिले.या पोलीस स्टेशन करिता नागरिकांची असलेली मागणी आमदार रवी राणा यांनी तसेच मा.पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दखल घेऊन शासनाकडे पाठपुरावा केलेला होता. या पोलीस स्टेशन संबंधी आमदार रवी राणा व पोलीस नवीनचंद्र रेड्डी यांच्या संपूर्ण अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक घेऊन नवीन पोलीस स्टेशन बांधण्याकरिता पोलीस स्टेशनचे काम तातडीने सुरू करावे याकरिता आज पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या समवेत सार्वजनिक बांधकाम विभाग, तहसील विभाग, भूमी अभिलेख विभाग, विद्युत विभाग, व संबंधित असलेले अधिकाऱ्यासमवेत आलेल्या निधीबाबत चर्चा केली व ताबडतोब पोलीस स्टेशनचे काम सुरू करावे अशी संबंधित पोलिसांसमवेत सर्वच अधिकाऱ्यांना आ.रवि राणा यांनी निर्देश दिले.यामध्ये पोलीस स्टेशनचे बांधकाम तळमजला व पहिला माळा यावर संपूर्ण सुसज्ज पोलीस स्टेशन, त्याचप्रमाणे दुसऱ्या माळयावर रेकॉर्ड रुम, संपूर्ण कर्मचारी वर्गासाठी कार्यालय, कैदयासाठी लॉकप व तिसऱ्या माळया महिलांसाठी विशेष कैदी लॉकप, महिला कर्मचाऱ्यासाठी राहण्याची व्यवस्था, चौथ्या माळयावर पोलीस राखीव दल व आपतकालीन पोलीस दलाकरीता राहण्याची व जेवणाची सुसज्ज व्यवस्था अशाप्रकारे ईमारत बांधकाम करण्यात येणार आहे.यावेळी आमदार रवी राणा, पोलीस आयुक्त श्री नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, पोलीस उपायुक्त बोरवणकर मॅडम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मेहेत्रे, उपकार्यकारी अभियंता तुषार काळे, सहायक अभियंता देशमुख मॅडम, अमरावती तहसीलदार लोखंडे, भुमिअभिलेख अधिकारी नेमाडे, विद्युत विभागाचे उपअभियंता फरकाडे, महानगरपालिका सहाय्यक संचालक वाघाडे, रामटेके, उपअभियंता महाजन सपकाळे, खोलापुरी गेट पोलीस स्टेशनच्या ठाणेदार स्वाती पवार, क्राईम ब्रँच जाधव, अवचार यांच्यासह गणेशदास गायकवाड, विनोद गुहे, उमेश ढोणे, राजेश आंबडकर, विलास पवार, अशोक पांडे, सुनिल धांडे, राजेंद्र कांडलकर, गजानन बलान्से, मधुकर गाडबैल, नरेंद्र राऊत, अनिल ढोले, संगीत मानकर, अजय मोरया, निलेश पवार, निलेश अंभोरे, अनुप अग्रवाल, किरण अंबडकर, कमलकिशोर मालानी यांच्यासह पोलीस स्टेशन बचाव समितीचे संपूर्ण पदाधिकारी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# गोकुल धाम कॉलनीच्या रस्त्यांची दुर्दशा परिसरातील नागरिकांना डेंगूसदृश आजाराची लागण

## गोकुल धाम परिसरात रस्त्यावर साचली गटारगंगा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०चांदुर बाजार**

स्थानिक गोकुल धाम कॉलनी चांदुर बाजार येथील शिवाजी वाकोडे ते शरदराव धोटे यांच्या घरा जवळील परिसर हा गेल्या कित्येक दिवसापासून विकासाच्या बाबत मागासलेला दिसत आहे वारंवार निवेदने संबंधित विभागाला व लोकप्रतिनिधीला दिले असताना सुद्धा कुठलेही पाऊल उचलले गेले नाही पावसाच्या पाण्याचे डबके रस्त्याच्या मधोमध साचले गेले आहे त्या खडच्यामध्ये विषाणूजन्य कीटकांची निर्मिती सुद्धा होत आहे सांडपाणी व्यवस्था यांचा योग्य निचरा होत नसल्याने येथील परिसरातीलनागरिकांवर याचा दुष्परिणाम होत आहे तर सदर मार्गावर शाळकरीविद्यार्थी वयोवृद्ध नागरिक यांना पायी चालणे सुद्धा कठीण झाले आहेयेथील नागरिक हजारो रुपये आपला कर स्वरूपात निधी संबंधित शिरजगाव बंड ग्रामपंचायत विभागाला देत



असतात परंतु त्या तुलनेत विकास अपूर्णच झालेला आहे रस्त्याच्या मधोमध टोलेजंग खड्याची निर्मिती झाली असून त्याला तलावाचे स्वरूप सुद्धा प्राप्त झाले आहे सुज्ञ व सुजान शिक्षित संबंधित विभागाने या वस्तुस्थितीची दखल घेणे क्रमप्राप्त आहे असे न झाल्यास येथील परिसरातील नागरिक हे संबंधित विभागासमोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचे व्यक्त होत आहे गोकुल धाम कॉलनी चांदुर बाजार परिसरात अनेक वर्षांपासून रोड व नाली नसल्याने पावसाच्या पाण्याने कॉलनी मध्ये पुराचे स्वरूप पाहायला मिळत आहे या ठिकाणी साचलेल्या पाण्याने लहान मुलांना आजरांचे स्वरूपात रूपांतर होत आहे या गोष्टीचा तीव्र निषेध करत गोकुल धाम कॉलनी वासीयांनी रोड च्या मधोमध बेसरम चे झाले लावून ग्रामपंचायत शिरजगाव बंड यांच्या निषेध केला आहे या ठिकाणी रोड ची पूर्णता दुर्दशा झाली आहे या ठिकाणी मुरूम टाकण्यात यावा ,रोड करण्यात यावे, नाल्या करण्यात याव्या अशी मागणी कॉलनीतील नागरीकांनी केली आहे वारंवार सूचना देऊन सुद्धा या गोष्टीची दखल न घेतल्यास या ठिकाणी होणाऱ्या मुलांच्या जीवास ग्रामपंचायत शिरजगाव बंड पूर्ण पणे दोषी राहणार असल्याचे गोकुल धाम कॉलनीतिल नागरिकांनी म्हटले आहे.

# महावितरण विभागाच्या विरोधात नरेंद्र पडोळे यांचे येसुर्णा येथे आजपासून बेमुदत उपोषण

## जलत्याग करण्याचा ही दिला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अचलपूर**

शासनाच्या विविध विभागात वाढलेल्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर वारंवार निवेदन देऊन आणि पाठपुरावा करूनसुद्धा कारवाई करण्यात दिरंगाई होत असल्याने अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख पडोळे यांनी येसुर्णा येथे २९ जुलै पासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.जर दोन दिवसात तोडगा काढण्यात आला नाही तर जलत्याग करण्याचा इशारा पडोळे यांनी दिला आहे.तत्पूर्वी पडोळे यांच्या नेतृत्वात आणि पदाधिकारी शिवसैनिकांच्या उपस्थितीत उपविभागीय अधिकारी यांना अन्नत्याग आंदोलन करण्याबाबत निवेदन देण्यात आले होते.

महावितरण,कृषी,महसूल आणि सार्वजनिक बांधकाम विभाग येथे सुरू असलेला भ्रष्टाचार उजागर करण्यात आला.महावितरणमध्ये मेंटनन्सची कामे करतांना अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने कामे करून लाखोंचा मलिदा लाटला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.रस्त्याची निकृष्ट कामे करण्यात येत असून प्राकलनानुसार



कामे केली जात नसुन ठेकेदाराशी संगनमत केले जात असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.कृषी विभाग शासकीय योजनांची अंमलबजावणी करीत नसून महसूल कर्मचारी मौज्यात उपस्थित नसतात असेही म्हटले आहे.२०२४ मधील पंचायत समितीच्या आमसभेत कारवाई करण्याबाबत ठराव घेण्यात आला मात्र ठरावाची अद्यापही अंमलबजावणी करण्यात आली नाही.पंचायत समिती बांधकाम विभाग,पाणीपुरवठा विभाग,जलसंधारण विभाग,पंचायत विभाग,शिक्षण विभाग,आरोग्य विभाग याबाबत प्रधासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत.त्यामुळे येसूर्णा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ अन्नत्याग करणार असल्याचा इशारा देण्यात आला.त्यामुळे पडोळे यांनी आजपासून बेमुदत अन्नत्याग सुरू केला आहे. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच सौ संजीवनी वानखडे, श्रीधर काळे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी राजेश काळे, अतुल अवघड, विजय केसे, ऋषिकेश सगणे, विनोद काळे, सय्यद नाजिली, अशोक कराळे, आदेश काळे, मंगेश पुनसे, गोपाल चऱ्हाटे,अल्पेश गायकवाड, श्रीधर निघोट, अरुण भाऊ करडे, सुरज पडोळे विपुल अवघड सागर पुनसे राहुल बोरेकर चक्रधर भगत, गौरव निघोट चंद्रकांत रवराळे, गोलू निंगोट, गोलू वाडेकर, मनोज अवघड, सौ प्रेमीलाताई धांडे ,सौ रेखाताई पुनसे, सौ ज्योतीताई हरणे, सौ सुनंदा डाकोडे सौ मंगला चऱ्हाटे,सागर काळे, गौरव कराळे, पंकज डाकोडे, मनोज काळे, अमित काळे, विनोद गायकवाड यांच्यासह यां येसूर्णा पंचक्रोशीतील बहुसंख्य नागरिक महिला पुरुष युवा मंडळी व तसेच आजूबाजूच्या परिसरातील शिवसेनेचे मंडळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# दापोरी येथे खेळ मानाच्या पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन शेकडो महिलांना कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०दापोरी**

मोर्शी विधानसभा मतदार संघामध्ये विक्रम ठाकरे मित्र परिवारातर्फे मातृशक्ती जागर-खेळ मानाच्या पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अश्या प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करून सोबतच शिस्त, सामाजिक, नितीमुल्ये, नैतीकता तथा आदर्शाचे वास्तव धडे देऊन त्यातूनच सकारात्मक दृष्टीकोनाने उन्नत जीवनाच्या मार्गाने प्रवास करण्यासाठी आत्मबळ वाढविण्यासाठी मतदार संघातील हजारो महिलांसाठी मातृशक्ती जागर-खेळ मानाच्या पैठणीचा या आयोजन करण्यात आले आहे.

विक्रम ठाकरे मित्रपरिवारा तर्फे दापोरी येथील श्री संत




लालदासबाबा सभागृहामध्ये आज दिनांक ३० जुलै रोजी दुपारी ४ वाजता मातृशक्ती जागर-खेळ मानाच्या पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून झी टीव्ही फेम कॉमेडी कलाकार मिमिक्री आर्टिस्ट संदीप जाधव हे महिलांकरिता विविध मनोरंजनात्मक खेळ, गमती जमती,गमतीदार उखाणे तसेच ऑर्केस्ट्रा घेऊन येत आहेत. खेळ मानाच्या पैठणीचा या महिलांकरिता विशेष मनोरंजनात्मक कार्यक्रमामध्ये विविध गमतीदार व मनोरंजनात्मक खेळामध्ये विजेत्या महिलांना बक्षीस म्हणून मानाची पैठणी देण्यात येणार आहे. तसेच इतर विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे सुद्धा दिली जाणार आहे. या कार्यक्रमांमध्ये सहभागी सर्वच महिलांना लकी ड्रॉ द्वारे बक्षीस जिंकण्याची संधी सुद्धा मिळणार आहे. आपल्या दैनंदिन संसारिक व्यस्ततेमधून थोडा का होईना माता भगिनींना विरंगुळा मिळावा तसेच मातृशक्तीच्या ऋणातून उतराई होण्याचा माणस ठेवून विक्रम ठाकरे मित्रपरिवार द्वारे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.अनेक माध्यमांमधून किंवा केवळ टीव्हीच्या पडद्यावर पाहता येणारा मनोरंजनात्मक कार्यक्रम विक्रम ठाकरे परिवाराच्या माध्यमातून महिला भगिनींच्या विशेष मनोरंजनाकरिता दापोरी येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमांमध्ये महिलांच्या विशेष कौशल्यांना वाव आणि हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच त्यांना मनोरंजनात्मक कार्यक्रमाचा आस्वाद घेता यावा या दृष्टिकोनातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी दापोरी येथील सर्व माता भगिनींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन माजी पंचायत समिती सभापती विक्रम ठाकरे व विक्रम ठाकरे मित्रपरिवार यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# धामणगाव येथे चोरट्यांकडून गोवंशाची चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०धामणगाव रेल्वे**


स्थानिक छत्रपती शिवाजी चौकात तीन व्यक्ती कारमध्ये गोवंश कोंबून नेतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर गोरक्षक समिती व हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत.

स्थानिक छत्रपती शिवाजी चौक परिसरात यापूर्वीदेखील गोवंशाची तस्करी होत असल्याचे प्रकार उघड झाले आहेत. त्यानंतर आता २८ जुलै रोजी मध्यरात्री एक ते दीड दरम्यान एका पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये दोन ते तीन जण दोन गोवंश बळजबरी कोंबत असतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला. त्यामुळे हिंदुत्ववादी संघटना व गोरक्षक समितीच्या कार्यकर्त्यांनी संतप्त भावना व्यक्त करीत निषेध नोंदविला. सदर कार मालकाला शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी दत्तापूरचे ठाणेदार गिरीश ताथोड यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली.

# 'सामाजिक उत्थान' या विषयावर विचार गोष्टीत पवन नयन जायसवाल आमंत्रित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

भारतात कलाल, कलार, कलवार, कलचुरी समाजाचे प्रतिनिधित्व करणारी, १९०५ मध्ये स्थापित आणि १९११ साली अखंड भारताचे प्रयागराज, उत्तरप्रदेश येथे समाजाचा पहिला अखिल भारतीय सम्मेलन आयोजित करणारी 'अखिल भारतीय हैहय कलचुरी महासभा' च्या स्थापना दिवस समारोहाचे आयोजन ०३ आणि ०४ ऑगस्टला मध्यप्रदेश ची राजधानी भोपाळ येथे एल. एन. सी. टी. विश्वविद्यालयाचे सभागार, जे. के. हॉस्पिटल परिसर, कोलार रोड येथे साजरा होणार आहे. महान इतिहासकार डॉ. काशी प्रसाद जायसवाल, कलचुरी कालीन इतिहास संशोधक राव बहादुर डॉ. हीरा लाल राय आणि भारतीय संविधान सभेतील महत्वपूर्ण सदस्य, महान गणितज्ञ गोरख प्रसाद जायसवाल सारख्या महानुभावांनी या संस्थेचा अध्यक्षीय पदभार सांभाळला आहे.




या समारंभात पहिल्या दिवशी 'सामाजिक उत्थान' या विषयावर विचार गोष्टी चे आयोजन आहे. यात संपूर्ण भारतातून येणाऱ्या समाजाच्या विविध संघटनेचे प्रतिनिधी आमंत्रित करण्यात आले आहे. या समारंभात अमरावतीचे सामाजिक कार्यकर्ते आणि साहित्यिक पवन नयन जायसवाल यांना अखिल भारतीय हैहय कलचुरी महासभेचे अध्यक्ष जयनारायण चौकसे आणि एड. शंकरलाल राय यांनी आमंत्रित केले आहे. अखिल भारतीय जायसवाल सर्व वर्गीय महासभा चे राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष पवन नयन जायसवाल यापूर्वीही भोपाळ, इंदूर, नागपूर, हैदराबाद, जयपूर आणि हरिद्वार येथे समाजाच्या आयोजित केलेल्या विचार मंथन आणि सम्मेलनात सहभागी झाले आहे.

दूसऱ्या दिवशी नवगठित कार्यकारिणी चे शपथविधी आणि देश-विदेशातील विवाह योग्य मुलां-मुलींचे परिचय सम्मेलन आणि स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

# सामान्यांचा सणही होणार गोड! 'आनंदाचा शिधा'बाबत सरकारचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

जनसामान्यांनाही सण आनंदाने साजरे करता यावेत यासाठी सुरू करण्यात आलेली 'आनंदाचा शिधा' ही योजना गौरी गणपती उत्सवासाठी देखील राज्य सरकार राबविणार आहे. राज्यातील १ कोटी ७० लाख ८२ हजार ८६ शिधापत्रिकाधारकांना 'आनंदाचा शिधा' चे वाटप १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत करण्यात येईल.




मागील दोन वर्षापासून गौरी गणपती, दिवाळी, गुढी पाडव्याच्या निमित्ताने आनंदाच्या शिध्याचे वाटप केले जाते. राज्यातील नागरिकांकडून त्याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याने ही योजना यंदाही राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रती संच १०० रुपये या सवलतीच्या दराने मिळणाऱ्या या 'आनंदाचा शिधा' संचामध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर सोयाबीन तेल यांचा समावेश आहे.राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे, नागपूर विभागातील वर्धा आणि १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिका धारक शेतकऱ्यांना हा आनंदाचा शिधा मिळेल. प्रती शिधापत्रिका एक शिधा जिन्नस संचाची खरेदी करण्यासाठी ५६२ कोटी ५१ लाख रुपये इतक्या खर्चास मान्यता

# खासगी अनुदानित शाळांसाठी खुशखबर!

## शिक्षकेतर कर्मचारी भरतीचा मार्ग मोकळा; '१० हजार' पदांची मेगाभरती

### सप्टेंबर २०२३ रोजीची आधार-व्हॅलिड पटसंख्या ग्राह्य धरली जाणार



**शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची स्थिती**

| | |
|---|---|
| आकृतीबंधानुसार मंजूर पदे | ३३,००० |
| लिपिकांची एकूण पदे | १७,५०० |
| प्रयोगशाळा परिचर, ग्रंथपाल पदे | १५,५०० |

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीसंदर्भातील २८ जानेवारी २०१९ रोजीच्या शासन निर्णयाला न्यायालयाने दिलेली स्थगिती फेब्रुवारी २०२४ मध्ये उठवली आहे. शासनाने शैक्षणिक संस्थांमधील ३३ हजार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. आता ३० सप्टेंबर २०२३ च्या संचमान्यतेत शाळांनी भरलेल्या पटसंख्येच्या प्रमाणात ही भरती होईल. अमरावतीसह राज्यभरात अंदाजे १० हजारांपर्यंत पदांची भरती या निर्णयामुळे होवू शकते. ऑगस्टअखेर भरतीला सुरवात होवू शकते, अशी माहिती शिक्षण संचालक कार्यालयातील विश्वसनिय सूत्रांनी दिली.

२०१९च्या नंतर खासगी अनुदानित शाळांची संचमान्यता झालेली नाही. शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयाला काहींनी आव्हान दिल्यानंतर उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. स्थगिती उठल्यानंतर ३० सप्टेंबर २०२३ च्या संचमान्यतेवेळी शाळांनी भरलेली सरल पोर्टलवरील पटसंख्या तीही आधार व्हॅलिड पटसंख्या ग्राह्य मानून शाळांनी संचमान्यतेत भरलेली शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे त्याठिकाणी बसतात का, याची पडताळणी सध्या सुरू आहे. त्यात वरिष्ठ व कनिष्ठ लिपिक, मुख्य लिपिक, प्रयोगशाळा परिचर, ग्रंथपाल या पदांचा समावेश आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये शाळांनी संचमान्यतेवेळी भरलेली माहिती ऑनलाइन संचमान्यतेत टाकून पटसंख्येच्या प्रमाणात शाळांनी मागणी केलेली पदे खरोखर त्या शैक्षणिक संस्थेत बसू शकतात का, ही बाब तपासून पाहिली जात आहे. २०१३-१४नंतर थेट २०१९मध्येच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संचमान्यता झाली होती. आता ३० सप्टेंबर २०२३च्य संचमान्यतेनुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरली जाणार आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे अत्यल्प पगारावर किंवा विनापगारावर काम करणाऱ्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**शिपाई पदाची भरती स्वतंत्र होणारे**

शालेय शिक्षण विभागाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार सध्या मुख्य, वरिष्ठ, कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा परिचर, ग्रंथपाल ही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरली जाणार आहेत. त्यासाठी ३० सप्टेंबर २०२३ च्या संचमान्यतेत शाळांनी भरलेली पटसंख्या तीही आधार- व्हॅलिड ग्राह्य धरली जाणार आहे. दरम्यान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधील शिपाई पदांची भरती यावेळी होणार नाही. त्यांची भरती पुढे स्वतंत्रपणे होणार आहे. तुर्तास शिपायांची पदे वगळून उर्वरित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांची भरती करण्याच्या दृष्टीने युद्धपातळीवर कार्यवाही सुरू झाली आहे.

# सणासुदीच्या कालावधीत गोंधळ घालाल तर तडीपार व्हाल

## पोलिस प्रशासन सज्ज : प्रतिबंधात्मक कारवाई सुद्धा केली जाणार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

नागपंचमीनंतर विविध सणांना सुरुवात होणार आहे. त्यामुळे पोलिस प्रशासन अलर्ट झाले आहे. सणासुदीच्या कालावधीत शांतता भंग होण्याची शक्यता असल्यास अशा व्यक्तीला तडीपार केले जाते.

पुढील महिन्यात गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. बहुतांश सार्वजनिक गणेश मंडळांच्यामार्फत गणेशोत्सव साजरा केला जाते. या कालावधीत मोठ्या प्रमाणात गर्दी उसळते. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची दमछाक होते. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना तडीपार करण्याची कारवाई महसूल व पोलिस प्रशासनामार्फत केली जाते.

### चोरट्यांवर राहणार लक्ष

गणेश उत्सव व नवरात्रीच्या कालावधीत नागरिकांची गर्दी उसळते. या कालावधीत चोरटे सक्रीय होतात. चोयांचे प्रमाण कमी करण्यासाठी स्थानिक पोलिस प्रशासन सज्ज राहणार आहे.

### ७ सप्टेंबरपासून गणेश उत्सवाला सुरुवात

७ सप्टेंबरला गणेश चतुर्थी आहे. या कालावधीपासून दहा दिवस गणेश उत्सव मंडळांमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामुळे या कालावधीत पोलिस विभाग अलर्ट राहील.

### प्रतिबंधात्मक कारवाई

तडीपारीच्या कारवाईसोबतच काही गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. या कारवाईदरम्यान काहींना नोटीस बजावून समज दिली जाते. पोलिस ठाण्यात दर दिवशी हजेरी लावणे सक्तीचे केले जाते.

### नवीन कायद्यानुसार होणार गुन्हा दाखल

देशात १ जुलैपासून नवीन कायदा लागू करण्यात आला आहे. यावर्षीच्या गणेश उत्सव व इतर सणांच्या कालावधीत गुन्हा घडल्यास नवीन कायद्याच्या कलमानुसार कडक कारवाई केली जाणार आहे.

# नारळाने ओलांडली तिशी ग्राहकांच्या खिशाला कात्री

## महागाईचा फटका; सणासुदीत आवक चांगली अन् मागणीही वाढली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

श्रावण महिना म्हटले की त्यामध्ये येणाऱ्या रक्षाबंधन, नाग पंचमीसह विविध सणांची रेलचेल असते. त्यामुळे नारळाच्या मागणीत सतत वाढ होत असून सध्या शहरात महिन्याला सहा ते सात ट्रक नारळ येत आहेत. ओल्या नारळाचा दर २५ ते ३० रुपयांवर तर सुके नारळ ४० रुपयांवर गेला आहे. त्यामुळे यंदा पूजेवरही महागाईचे सावट आहे.

उत्पादन चांगले असले तरी मागणी वाढलेली असल्याने नारळाचे भाव वाढलेले आहेत. त्यामुळे सध्या दररोज दीड लाखांच्या जवळपास नारळाची विक्री होत आहे. किरकोळमध्ये नारळ ३० रुपयांपर्यंत मिळत आहेत. चातुर्मासात अनेक धार्मिक व्रतवैकल्ये असल्यामुळे पूजेसाठी नारळांना अधिक मागणी असते.

चातुर्मासात अमरावतीत साडेतीन लाखांपर्यंत नारळांची विक्री होते. शहरात तमिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश आणि गोवा येथून नारळांची आवक होते. चारही राज्यांत उत्पादन चांगले झाले आहे. त्यामुळे आवकही सुरू झाली आहे. दररोज शहरात सात ते आठ गाड्यांची आवक सुरू आहे. पूर्वीच्या तुलनेत नारळाचे व्यापारीही कमी झाले आहेत. सध्या १० ते १२ व्यापारी हा व्यापार करीत आहेत. भाव यंदा वाढलेले आहेत.सध्या बाजारात सुक्या आणि ओल्या नारळाची आवक होत आहे. १०० भरतीच्या ओल्या नारळाची किंमत १६००-१६५० रुपये आहे. तर मध्यम आकारातील १२० ते १५० भरतीच्या नारळाची किंमत १७५० ते १९०० रुपये आहे. या नारळ घाऊकमध्ये नगाला २० ते २२ रुपयांदरम्यान तर किरकोळमध्ये ३० ते ३५ रुपयांपर्यंत मिळत आहे. आवक चांगली असली तरी मागणी वाढणार असल्याने अजून भाववाढीचे संकेत आहेत. पावसामुळे सध्या नारळाची आवक थोडी कमी झालेली आहे.

# भाजप/काँग्रेस मध्ये हिंमत असेल तर प्राध्यापक आणि आमदारांचा पगार कमी करावा - बच्चू कडू यांचे थेट आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०धाराशिव**

प्रहार पक्षाचे नेते आमदार बच्चू कडू यांनी आमदार आणि प्राध्यापकांच्या पगारांबद्दल मोठं वक्तव्य केले आहे. कडू यांनी थेट भाजप आणि काँग्रेस पक्षाला आव्हान दिलं असून धमक असेल तर प्राध्यापक आणि आमदारांचा पगार कमी करावा असं ते म्हणाले आहेत.

आमचे २५ देखील आमदार निवडून आले तर आम्ही प्राध्यापक आणि आमदाराच्या पगारी कमी करण्याचं पहिलं काम करू, भाजप आणि काँग्रेसमध्ये धमक असेल तर त्यांनी करून दाखवावे. प्राध्यापकाला अडीच लाख आमदारांना तीन लाख एवढा पगार कशासाठी? एका पंक्तीमध्ये काहीच नाही तर दुसऱ्या पंक्तीमध्ये बळच



टाकताय. कुणाच्या बापाचं राज्य आहे का? आम्ही मतं देतोय त्यामुळे ही गुंडागर्दी चालणार नाही, असं वक्तव्य बच्चू कडू यांनी केले. मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील उमरगा येथे एका खाजगी कार्यक्रमादरम्यान कडू बोलत होते.पुढे बच्चू कडू यांनी शरद पवारांच्या वक्तव्यावर देखील भाष्य केलं आहे. शरद पवार यांनी नवी मुंबईतील वाशी येथे आयोजित सामाजिक एकता परिषदेत बोलताना मणिपूरमधील घटनांप्रमाणे महाराष्ट्रात अशांततेची भीती व्यक्त केली होती. याबद्दल विचारण्यात आल्यानंतर बच्चू कडू म्हणाले की, हा पुरोगामी महाराष्ट्र आहे, या सगळ्या गोष्टी महाराष्ट्राने सोसल्या आहेत. महाराष्ट्रात मणिपूर सारखी स्थिती होईल असं काहीही चित्र नाही, हा पुरोगामी महाराष्ट्र आहे या सगळ्या गोष्टी महाराष्ट्राने सोसल्या आहेत. याचा अनुभव महाराष्ट्रातल्या लोकांना आहे.अलीकडच्या काळात महाराष्ट्रातही मणिपूर सारखी स्थिती होते की काय अशी चिंता वाटू लागल्याचे वक्तव्य शरद पवारांनी केलं होतं. शरद पवारांचा हा दावा खोडून काढत असं कुठलंही चित्र नसल्याचं बच्चू कडूंनी म्हटले. तसेच अशी अवस्था होऊ नये अशी प्रार्थना करतो असेही आमदार बच्चू कडू म्हणालेत.

# स्वच्छतेची वाट लावणाऱ्यांच्या गळ्यात घंटी कटल्याच्या घंटा बांधा

## अस्वच्छतेचा मलिदा कोण लाटत आहेत ?राजाश्रय कोणाचा? कारवायांचा बडगा का नाही? शिवराय कुळकर्णी यांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३०अमरावती**

अमरावती शहरात महानगरपालिकेकडून साफसफाई होत नसल्याने साथीचे आजार पसरत आहेत म्हणून आ. रवी राणा यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह मनपा प्रशासनाला धारेवर धरून कडक निर्देश दिल्याबद्दल आ रवी राणा यांचे आभार.नेहमी प्रमाणे या बैठकीतील गरम माहोलच्या बातम्या सर्वत्र उमटल्या आहेत. आ. रवी राणा यांनी याच बैठकीत शहरात साफसफाईचा कंत्राट घेणारे कंत्राटदार आणि विविध परिसरातील नागरिकांचे प्रतिनिधी बोलवले असते तर या कंत्राटदारांनी शहराच्या स्वच्छतेची कशी वाट लावली आहे, याचे पुरावे अधिकाऱ्यांना जागेवरच मिळाले असते. आता मनपानेच एक बैठक बोलवून कंत्रातदारांसमक्ष नागरिकांचे म्हणणे ऐकावे. जेव्हापासून साफसफाईचा नवा कंत्राट देण्यात आला तेव्हा पासून



अमरावती शहर अधिकाधिक गलिच्छ करण्याचा जागतिक विक्रम सुरू झाला आहे. या कंत्राटदारांसमोर 'ब्र' काढण्याची सामान्य माणसाची हिंमत नाही. कारण या सर्व ठेकेदारांना मोठा राजाश्रय आहे. मोठ्या नेत्यांचे बगलबच्चे शहराला अधिकाधिक घाण करून मलिदा लाटताहेत. हे ठेकेदार कोण आहेत, यांनी प्रत्येक प्रभागात सफाईसाठी किती माणसं नेमले आहेत, प्रत्येक प्रभागाला किती घंटीकटले किंवा घंटा गाड्या आहेत, प्रत्येक प्रभागात किती कचरा कंटेनर आहेत, फवारणी, गवत झुडपे कापणे, कचरा कंटेनर वेळेवर उचलणे ही कामे कोणाची, हा सर्व गोषवारा मनपाने जनतेसाठी जाहीर करायला हवा. ठेकेदार मोठ्या नेत्यांच्या गळ्यातला ताईत असल्याने तो सामान्य लोकांशी अरेरावी करतो. त्याला वठणीवर आणणाऱ्या अधिकाऱ्यांना राजकीय दबावात तोंडात मूग गिळून कारवाई न करता शहराची दुर्दशा सहन करावी लागते का, असे असंख्य प्रश्न जनतेच्या मनात आहेत.ठेकेदार कोणत्या राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आहेत, ते कोणाचे प्रायोजक आहेत, यावर जनता खुलेपणाने चर्चा करते. ये पब्लिक है - सब जानती है ! तरीपण या बैठकीचा परिणाम साधायचा असेल तर घंटीकटल्यावरच्या घंट्या या ठेकेदारांच्या गळ्यात बांधण्याची हिंमत जो पर्यंत दाखवली जाणार नाही, तो पर्यंत शहर स्वच्छ होणार नाही. शहराची वाट लावणाऱ्या या ठेकेदारांवर कारवाई झाल्याशिवाय शहर स्वच्छ होणार नाही, असा जनतेचा सूर आहे. आ. रवी राणा आणि सर्व लोकप्रतिनिधी याकडे लक्ष देतील अशी जनतेची अपेक्षा आहे.

# मनसे कार्यकर्त्यांकडून गाडीवर हल्ला : अमोल मिटकरी म्हणाले, हा भेकड हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अकोला**

दिलेला शब्द पाळणाऱ्या अजित पवारांबाबत सुपारी बहाद्दरांनी बोलू नये. कारण हे सुपारी बहाद्दर, टोल नाका असेल किंवा भोंग्यांचे आंदोलन असेल, असं कोणतेही आंदोलन यशस्वी करू शकलेले नाही, अशी टीका अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी काल केली होती. त्यांच्या या टीकेचे पडसाद आज उमटले असून मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या गाडीवर आज अकोला



येथे हल्ला केला आहे. या हल्ल्याला मी भीक घालत नाही, अशी प्रतिक्रियाही अमोल मिटकरी यांनी आज दिली. ते टीव्ही ९ मराठीशी बोलत होते.

महाराष्ट्राचं नाव घेतात आणि अशाप्रकारे गुंडागर्दी करतात. हा भेकड हल्ला आहे. या हल्ल्यांना मी घाबरत नाही, असं अमोल मिटकरी म्हणाले. या हल्ल्यावेळी मी विश्रामगृहात होतो. काही जण मला भेटायला आले होते. त्यासाठी मी येथे आलो होतो. मनसेच्या कार्यकर्त्यांने हा हल्ला केला. मी याविरोधात कायदेशीर तक्रार दाखल करणार आहे, असा इशाराही त्यांनी दिला.मनसेच्या कार्यकर्त्यांनी अमोल मिटकरी यांच्या कराच्या काचा फोडल्या आणि प्रचंड घोषणाबाजी केली. याबाबत अमोल मिटकरी म्हणाले की, मी कोणाच्याही धमक्यांना भीक घालत नाही. माझं वक्तव्य मागे घेण्याचा प्रश्नच येत नाही. पण कार्यकर्त्यांना शांततेचं आवाहन केलं आहे. आपण कायदेशीर कारवाई करू, असंही ते म्हणाले.

सुपारी बहाद्दर लोकांकडून जनतेने योग्य तो धडा घेतला आहे. त्यांनी नव्या नवरीचे नऊ दिवस म्हणून पुण्यात कुठं तरी भेट दिली आहे. ज्यांना साधा एनडीआरएफचा फुलफॉर्म माहिती नाही, त्यांनी आपत्ती व्यवस्थापनावर बोलावं, हा अलीकडच्या राजकारणातला सर्वात मोठा विनोद आहे, असा टोलाही अमोल मिटकरी यांनी लगावला होता.

# श्री शिवाजी कूषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दिली बँक ला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३० अमरावती**

श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती येथील कृषी दूतांनी शुक्रवारी दुपारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अमरावती ला भेट दिली येथील बँक मॅनेजर श्री मनोज पिंजारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यानि विद्यार्थ्यांना बँक बदल संपूर्ण माहिती दिली . विद्यार्थ्यांनी त्यांना काही प्रश्न विचारले त्यांचे पण त्याणि उत्तर दिले कृषी दूतांनी




बँक चे प्रकार वेगवेगळ्या योजना कर्जप्रणाली, बचत ठेव योजना या बद्दल माहिती गोळा केली यात कृषी दूत योगीराज वि खडसे, श्रेयश प बनसोड ,अनिकेत ज गाभने, धिरजकुमार देशमुख ,नरेंद्र भुजाळे ,गौरव दिघोळे ,सत्यम लवगे अभिषेक पंडीत , ओम लेकरुवाळे इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.